

श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा

।। समओवी ।।

# पारायणव्रत

● भावार्थ समओवी व भावगीता ●

डॉ. सुहास पेठे

श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा

# ।। समओवी ।।

चिंतनदीपिका, प्रश्नोत्तरे, भावगीता यांसह संपादित चौथ्या आवृत्तीची

## - पारायणप्रत -

● भावार्थ समओवी व भावगीता ●

**डॉ. सुहास पेठे**

# ❊ श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

पुस्तकरूपाने प्रकाशित आवृत्ती दुसरी : ऑगस्ट, २०१५
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

## ● पारायणप्रतीचे प्रास्ताविक ●

श्री ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायाच्या समओवीची ही छोटेखानी पारायणप्रत श्रीकृपेने सादर होत आहे. नवव्या अध्यायातला श्री माउलींच्या अपूर्व विवरणाचा आनंद घेण्यात तत्कालीन भाषेची तांत्रिक अडचण येऊ नये म्हणून अन्य पूर्वप्रयत्नांप्रमाणेच काही वर्षांपूर्वी श्री गुरुकृपेने झालेला हा नम्र प्रयत्न आहे. त्याची विस्तृत भूमिका,चिंतनदीपिका तसेच निवडक प्रश्नोत्तरे आणि मूळ नववा अध्याय यांसह मजकुराची मोठ्या टाईपातील व मजबूत टिकाऊ बांधणीची 'समओवी'ची पहिली आवृत्ती नोव्हेंबर २००७ मध्ये प्रकाशित झाली. अलीकडे समओवीची तिसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली आहे.

समओवी प्रत्यक्ष बैठकीवर वापरणे सोपे पडत असले तरी आकार, बांधणी व पृष्ठसंख्या यांमुळे अन्यत्र नेण्याआणण्यास किंवा प्रवासात वापरण्यास ती प्रत थोडी अवघड झाली आहे. शिवाय समओवीमधल्या सुलभ अर्थाने मूळ प्रतिपादनाचा आनंद मिळून नुसत्या समओवीचेही जमेल तिथे पारायण करणाऱ्या जिज्ञासू भाविकांची संख्याही दरम्याने लक्षणीय झाली आहे. त्यासाठी अशा प्रकारच्या सुटसुटीत व फक्त समओवी असलेल्या पारायणप्रतीची अनेक दिवसांची मागणी या निमित्ताने पुरी होत आहे.

या आवृत्तीने पारायणसंख्या वाढली, ते सुलभ झाले, त्यामुळे अर्थ तसेच त्यांतील महत्त्वाचे विषय, संदेश, जीवनपद्धती यांची गोडी लागून मूळ नववा अध्याय वाचला जाऊ लागला व त्याचा आचरणाला उपयोग झाला तर या प्रतीचे नम्र उद्दिष्ट साध्य होईल. मूळ समओवीत समाविष्ट असलेल्या चिंतनदीपिकेतील विषय तसेच उत्तरे दिलेले निवडक प्रश्न पुढे माहितीसाठी दिले आहेत.

पारायण करणाऱ्या जिज्ञासूंनी त्यांसाठी समओवीच्या ग्रंथाची तिसरी आवृत्ती कृपया पाहावी, ही विनंती. हितबुद्धीची ही सर्व प्रांजळ सेवा श्रीकृष्णपरमात्मा, श्री माउली, सर्व संतसद्गुरू व सर्व वाचकमाउली यांनी गोड मानून घ्यावी आणि आम्हा सर्वांना भगवंताच्या अनुसंधानात ठेवावे, ही सर्वांच्या चरणी नम्र प्रार्थना.

**– सुहास पेठे**

---

**चिंतनदीपिकेतील विषय :**

**१. खऱ्या आनंदासाठी कष्टांचे प्रमाण २. आपल्या कल्पना बाजूला ठेवून आपल्याला विचार करता येईल का? ३. विपरीत ज्ञान : अस्तित्व व मर्यादा ४. पाप व प्रायश्चित्तावरचा सात्त्विक उपाय ५. भक्तांचे प्रकार ६. समजल्याशिवाय सारे व्यर्थ ७. कर्म अर्पावे पण धुऊन ८. भगवंत भावाचा आणि म्हणून सर्वांचा ९. सज्ञान कोण ? १०. योगक्षेमाची खात्री पण : कुणाच्या, कोणत्या व किती ? ११. नम्रतेची थोरवी**

**निवडक प्रश्नोत्तरे :**

**१. नवव्या अध्यायाची निवड कशासाठी ? २. हा अध्याय कोणासाठी आहे ? ३. यातील राजविद्या शिकायला आणखी कशाची गरज आहे ? ४. ही राजविद्या कितपत अवघड, अशक्य आहे ? ५. राजविद्येची पार्श्वभूमी ६. या विद्येचे थोडक्यात टप्पे ७. नवव्या अध्यायातून मला काय घेता येईल, काय करता येईल ?**

## श्री ज्ञानेश्वरीतील एक हृद्य प्रार्थना : अध्याय दुसरा

( येथे नित्य वाचन, मनन, चिंतन यांसाठी घेतली जाणारी प्रार्थना )

आम्हां काय उचित । तें पाहतां न स्फुरे येथ । जे मोहें येणें चित्त । व्याकुळ माझें ।।५५।। तिमिराविरुद्ध जैसें । दृष्टीचें तेज भ्रंशे । मग पांसींच असतां न दिसे । वस्तुजात ।।५६।। देवा मज तैसें जाहलें । जें मन हें भ्रांती ग्रासिलें । आतां काय हित आपुलें । तेंही नेणें ।।५७।। तरी श्रीकृष्णा तुवां जाणावें । निकें तें आम्हां सांगावें । जे सखा सर्वस्व आघवें । आम्हांसि तूं ।।५८।। तूं गुरु बंधु पिता । तू आमुची इष्ट देवता । तूंचि सदा रक्षिता । आपदीं आमुतें ।।५९।। जैसा शिष्यांतें गुरु । सर्वथा नेणे अव्हेरु । की सरितांतें सागरु । त्यजी केवीं ।।६०।। ना तरी अपत्यातें माये । सांडूनि जरी जाये । तरी तें कैसेंनि जिये । ऐकें कृष्णा ।।६१।। तैसा सर्वांपरि आम्हांसी । देवा तूंचि एक आहासि । आणि बोलिलें जरी न मानिसी । मागील माझें ।।६२।। तरी उचित काय आम्हां । जे व्यभिचरेना धर्मा । तें झडकरी पुरुषोत्तमा । सांगें आतां ।।६३।।

## श्री ज्ञानेश्वरांची आरती

जय देव जय देव श्री ज्ञानेश्वर ।
योग्यांची माउली, भक्तांची सावली, देव साकार ।। जय देव जय देव ।।धृ।।
भक्तीचा कैलास, ज्ञानसागर । ज्ञानेश्वर माझा प्रेमपाखर ।
ज्याला त्याला वाटे अपुला आधार । नाही झाली असली माउली थोर ।।१।।
जाणत असुनी गीता वेदार्थ सगळा । वंचित जीवांसाठी जीव कळवळला ।
ज्ञान सोपे करुनी अनुभवही दिधला । पसायदाने जीव शांत हा केला ।।२।।
धाक वेदज्ञांना, पाखंडी जना । अव्यक्ताची सत्ता दावी सर्वांना ।
देवमार्गी कोणी मोठा ना साना । दिंडीने विठ्ठल भेटे सर्वांना ।।३।।
साहुनी दुःख, बोल अज्ञ जीवांचे । हरिपाठे कल्याण केले सर्वांचे ।
ज्ञानेश्वरी अमृत अपुल्या भाषेचे । भाग्य दीना कळु दे काय हे अमुचे ।।४।।

।। ॐ श्री परमात्मने नमः ।।

तरी लक्ष एकवेळ द्यावे । मग सर्वसुखाला पात्र व्हावे । हे प्रतिज्ञावचन ऐकावे । स्पष्ट माझे ।।१।। आपणा सर्वज्ञांच्या सभेत । प्रौढीने न मी हे बोलत । लक्ष द्यावे ही विनंती करीत । अतिसलगीने ।।२।। मनोरथ पूर्ण होती। लाड अवघेचि घडती । जरी श्रीमंत मायबाप होती । तुम्हा ऐसे ।।३।। आपुल्या कृपादृष्टीच्या ओलाव्याने । फुलती प्रसन्नतेची राने । श्रमुनी सावलीला विसावणे । मजला घडे ।।४।। सुखामृताचे डोह आपण । आपुल्या इच्छेने बोलतो वचन । सलगी न करावी भिउन । मग शांत कसे व्हावे ।।५।। बालक बोबडे बोले । वेडेवाकुडे जरी चाले। तरी कौतुकाने माय बोले । समाधानी होउनी ।।६।। तसे तुम्हा संतांचे आम्हावर । राहो प्रेम निरंतर । या इच्छेने बहुप्रकार । सलगी करितो ।।७।। अन्यथा आपणासम सारस्वत श्रोते । असता सर्वज्ञ जाणते । शिकवू जाईल का कुणी तयाते । माझ्यासम अज्ञ ।।८।। काजवा असला किती मोठा। तरी सूर्यापुढे नगण्य छोटा । काय वाढावे अमृताच्या ताटा । ते मज कळेना ।।९।। शीतल चंद्राला वारा घालावा । नादब्रह्मापुढे राग गावा । साक्षात लेण्याला लेववावा । अलंकार कुठला ।।१०।। परिमळाने कसले सुगंध घ्यावे । सागराने कोठे नहावे।

आकाश ठेवण्या आणावे । वस्तुरूप कुठले ।।११।। तैसे आपुले चित्त रमेल । आपणा व्याख्यान वाटेल । ऐसे वक्तृत्व कुणाजवळ । असेल का कधी ।।१२।। तरीही सूर्य जरी विश्व प्रकाशवी । त्याची आरती का वातीने न करावी । समुद्रासी अर्घ्ये का न द्यावी। चूळभर पाण्याने ।।१३।। तैसे प्रभु शंकर श्रोते तुम्ही । दुबळा भक्त पुजारी मी । बेलाऐवजी निर्गुडी तुम्ही । माझी स्वीकाराल ना ।।१४।। मूल शिरे बापाच्या ताटात । त्यातलेचि बापाला देऊ लागत । तरी तो संतोषे तोंड पुढे करित । घास घेण्या ।।१५।। बालबुद्धी मी तैशी । बडबड करितो तुम्हापाशी। तरी संतोषता तुम्ही ऐशी । तऱ्हा आपुल्या प्रेमाची ।।१६।। आपुलकीच्या भावाने सतत । तुम्ही भरले आहात संत। ओझे तुम्हा न वाटत । माझे कधी ।।१७।। तान्हुला आईला झटतो बिलगतो । त्याने पान्हा अधिकचि फुटतो । रोषानेही प्रेमभाव वाढतो । प्रेमळाचा ।।१८।। तुमचे कृपाळूपण निजलेले । मज लेकराच्या बोलण्याने जागे झाले। ऐसे मज जाणवले । म्हणुनी बोलिलो ।।१९।। एरवी चांदणे काय लागे पिकवावे । वाऱ्याला गतिमान करावे । हे गगनास गवसणी घालावे । तैसे व्यर्थ ।।२०।। पाणी पातळ करणे न लगे । लोण्यामध्ये रवी न रिगे । तसे लज्जेने व्याख्यान न निघे । आपणापुढे मज मुखे ।।२१।। एरवी वेद होती

कुंठित । परि ज्यावरी शांत पहुडत। असा गीतार्थ मराठीत । सांगण्याची योग्यता कुठली ।।२२।। तरी सांगतो हे धाडसाने । मनी एक धरुनी आशेने। की या तरी धिटाईने । आपुले आवडते व्हावे ।।२३।। शांतवणारे चंद्राहून । संजीवक अमृताहून । ऐसे आपुले लक्ष देऊन । वाढवावे मम मनोरथा ।।२४।। तुमची कृपादृष्टी जरी वर्षत । तरी अर्थ स्फुरती बुद्धीत । अन्यथा अंकुरले कोंभही सुकत । तुम्ही उदास झाल्यावरी ।।२५।। श्रोत्यांचे लक्ष हा चारा होईल । आणि जरी तो वक्तृत्वाला मिळेल । तरी अक्षरातून मांडली जातील । उत्तम प्रमेये ।।२६।। मग अर्थ शब्दांची वाट पाहील । अभिप्रायातून अभिप्राय सुचेल । बुद्धीमध्ये स्फुरतील । फुलोरे भावांचे ।।२७।। म्हणून संवादाचे वारे सुटले तर । हृदयाकाशी सिद्धांतमेघ येणार । श्रोते दुश्चित्त असता जाणार । जमलेला आनंदही ।।२८।। चंद्रकांतमणी जरी द्रवला । तरी त्याचे श्रेय चंद्राला । वक्ता वक्ता नाही झाला । श्रोत्याविण ।।२९।। आता आम्हांला शिजवून गोड करावे । हे तांदुळांनी का विनवावे । बाहुल्यांनी का म्हणून प्रार्थावे । सूत्रधाराला ।।३०।। बाहुलीच्या कामासाठी तिला न नाचवी । तो अपुल्या कामासाठी तिला चालवी । म्हणून विनंतीच्या अधिक उठाठेवी । आम्ही का कराव्या ।।३१।। तेव्हा गुरु म्हणती काय झाले । हे सर्व

आम्हांला पावले । भगवंताने जे निरोपिले । ते सांग आता ।।३२।। येथे निवृत्तिदासाने संतोषून । होय होय आनंदाने म्हणून । ते मी आता सांगेन । ऐका, श्रीकृष्ण म्हणाले ।।३३।।

श्रीकृष्ण म्हणती जरि ही, विद्या अतिगुह्यतम असे ।
स्वभावे सरळ तू म्हणुनी, मोक्षार्थ सांगतो तुला ।।भावगीता.१।।

माझ्या अंतरंगातील गुज । आता पुढे सांगतो तुज । वर्म असे हे बीज । गुप्त जाण अर्जुना ।।३४।। अंतरंग करुनी उघडे । गूज मनातील एवढे । कां सांगती मजपुढे । तुज शंका येईल ।।३५।। तरी ऐक त्याचे कारण । तू आस्थेचा पुतळा बुद्धिमान । आज्ञेचे अगत्य पालन । सदा करिशी तू ।।३६।। मग गूढपण मोडले तरी मोडो । न सांगावे तरी सांगणे घडो । परंतु आमुच्या अंतरंगातील पडो । तुझ्या अंतरंगी ।।३७।। किती दूध गूढ जवळी असले । तरी स्तनासी काय कधी गोड लागले । मग अनन्य घेणारा मिळता भले । तृप्ती घडो त्याची।।३८।। कणगीतून बियाणे काढिले । निर्मळ भूमीमध्ये पेरिले । पेरण्याला म्हणती का सांडले । कुणी कोठे ।।३९।। म्हणून सुमन आणि शुद्धमती । असता अनिंदक तसा अनन्यगती । मग गुप्त तरी तयाप्रती । आनंदाने सांगावे ।।४०।। तरी आता या गुणांनी संपन्न । तुझ्यावाचून न दिसे अन्य । तरी न लपवावे गूज म्हणुन । तुझ्यापासुनी ।।४१।। सारखे म्हणता गुपित गुज ।

काही वेगळे वाटेल तुज । तरी आता ज्ञान सांगेन तुज । विज्ञानासहित ।।४२।। ते देखील असे सांगेन। की खरे खोटे वेगळे करून । देईन चांगले पारखून । निवाडा करून ।।४३।। जसे राजहंसाचे चोचीने। दूधपाणी वेगळे करणे। तसे ज्ञानविज्ञान स्वच्छपणे । वेगळे करून सांगू ।।४४।। वाऱ्यावर धरिता मळणीचा भुसा । कोंडा लांब जाऊन पडतो जसा । धान्याचा ढीग खाली स्वच्छसा । सहज साठे ।।४५।। ते ज्ञानविज्ञान जाणून । संसार संसाराला होतो अर्पण । जीव बसतो मोकळा होऊन । मोक्षलक्ष्मीच्या पाटावर ।।४६।।

राजविद्या सुखाची ही, अक्षय्य फलदायक ।
सिद्ध जी अनुभवे उत्तम, श्रद्धेने शुद्ध आचरी ।।भावगीता.२।।

ज्या ज्ञानाला विद्यांच्या गावी । सर्वश्रेष्ठ विद्येची पदवी । जे राजा म्हणून मिरवी । गूढ पवित्र गोष्टींचा ।।४७।। जे धर्माचे निजधाम । तसेच जे उत्तमांतील उत्तम । जे प्राप्त होता पुढील जन्माचे काम । उरले नाही ।।४८।। थोडे गुरुमुखाने कळत । मग दिसे अपुल्या अंतरात । आधीचेच आहे वसत । आपोआप ।।४९।। मग सुखाच्या पाऊलवाटेने चालावे । ज्याच्या भेटीला जावे । जेथे अनुभवणे संपावे । आपले संपूर्ण ।।५०।। भेटीच्याही अलीकडेच

मन असते । तेथूनचि आनंदा ये भरते । किती सुलभ सोपे असते । आत्मरूप ब्रह्म ।।५१।। याचे विशेष केवढे होय। हे हाती येता कोठे न जाय । अनुभवता कमी न होय । वीट न ये याचा ।।५२।। येथे तुला शंका येईल । एवढे सोपे कोण सोडील । कुणी अनुभवल्यावीण का राहील । इतुके मोठे ज्ञान ।।५३।। व्हावी एक रुपया व्याजाची प्राप्ती । म्हणून जे जळत्या आगीत उडी घालती । ते हे अनायास मिळते कसे टाकिती । सहजसुख।।५४।। हे धर्म्य, रम्य, पवित्र तसे । स्वत:च्या ठायीच वसे । सुखे मिळण्याजोगे असे । सहज आपल्यासी।।५५।। सुखकर असताही जनाहाते । ही प्राप्ती का न दिसते । शंका जरी रास्त वाटते । तरी तू ती शंका न धरी ।।५६।।

ज्यांची श्रद्धा न विद्येवर, आचारावरही नसे ।
त्यांना मी अप्राप्य असल्याने, संसारी येत ते पुन्हा ।।भावगीता.३।।

गाईच्या त्वचेच्या पदराआड । दूध असुनही पवित्र गोड । ते अव्हेरुनी गोचिड । अशुद्ध रक्त पितेच ना ।।५७।। एकाच चिखलाच्या घरी । कमळ बेडूक नांदती शेजारी । भुंगे घेऊन जाती पराग दूरवरी । बेडकांना उरे चिखलचि।।५८।। दुर्दैवी माणसाच्या घरी । सोनेचांदीच्या

पुरल्या घागरी । परी त्यावरी बसुनी उपास करी । दरिद्री तो ।।५९।। तसा हृदयामध्ये मी राम । असता सर्वसुखाचा आराम । पण भ्रमित इच्छिती विषय काम । सुखासाठी ।।६०।। डोळ्यांनी मृगजळाचा साठा पाहिला । त्यासाठी अमृताचा घेतला घोट थुंकिला । शिंपला मिळेल म्हणुनी टाकिला। परिस हातीचा ।।६१।। तसे 'मी-माझे'च्या नादात । बिचारे माझ्यापाशी न येत । मग जन्ममृत्यूच्या तीरांत । नदीच्या फेऱ्या करिती ।।६२।। तोंडासमोर सूर्य दिसतो । तितका सदैव सुलभ मी असतो । सूर्य रात्री तरी न दिसतो। हाही बोल मज नाही ।।६३।।

मीच विस्तारले आहे, सर्व अव्यक्त शक्तिने ।
आधारी सर्व हे माझ्या, कुणाच्या नच मी असे ।।भावगीता.४।।

हे जग अवघे चराचर । हा खरा माझाचि विस्तार । सहज मुरले दूध जर । तरी तेचि दही ।।६४।। बीजाचेच झाड व्हावे । सोन्याचे अलंकार घडावे । तसे मज एकाचे व्हावे । विस्तारलेले जग ।।६५।। अव्यक्तात जे एकवटले । ते विश्वाकारे पातळ झाले । माझे अव्यक्ताचे रूप विस्तारले । त्रैलोक्य हे ।।६६।। महत्तत्त्वापासून देहापर्यंत । जे जे वाटे पसरले भूत । ते माझ्याठायी भासत । जसा पाण्यावरी फेस ।।६७।। परि

फेसाआत पाहता। पाणी न दिसे पंडुसुता । जशी स्वप्नातील अनेकता । जागे झाल्या न दिसे ।।६८।। तशी सर्व भूते माझ्या ठायी । दिसती परी मी त्यांत नाही । हा मी तुज सातव्यात सांगितला पाही । विचार पूर्वी ।।६९।। म्हणुनी आवरतो बोलणे । नको आता पाल्हाळ लावणे । तू माझ्या स्वरूपी स्थिर होणे । दृष्टी लावुनी ।।७०।।

ऐश्वर्ययोग हा पाही, माझ्यामध्ये कुणी नसे ।
माझ्यावरी जरी चाले, मी न चाले तयावरी ।।भावगीता.५।।

माझी स्थिती मायेपलीकडील । मायिक कल्पना टाकुनी पाहशील । माझ्या ठायी भूते हेही व्यर्थ ठरेल । कारण मीच सर्व ।।७१।। संकल्पाची संध्याकाळ होता । बुद्धीच्या दृष्टीस येते क्षणिक मंदता । अस्पष्ट दिसतो अखंड असता । भूतांत दिसतो भिन्नभिन्न ।।७२।। संकल्पाची संध्याकाळ लोपत । मग मीच दिसे सर्वत्र अखंडित । जैसे शंका फिटता लोपत । सापपण दोरीचे ।।७३।। एरवी घडेघागरींचे आकार । येती का मातीतुनी आपोआप वर । ते कुंभारांच्या कल्पनेचे प्रकार । ठरतीच ना ।।७४।। काय लाटांच्या खाणी । पोटी वाहे समुद्राचे पाणी । ही लाटांची अविरत करणी । वाऱ्याचीच नव्हे का ।।७५।। जसे पाही कापसाच्या पोटी । असते का कपड्यांची पेटी । कपड्यांची बनवी सृष्टी । नेसणाऱ्यांची

दृष्टी ।।७६।। जरी सोने अलंकार झाले । तरी त्याचे सोनेपण न मोडले । अलंकार हे वरकरणी घडले । घालणाऱ्याप्रमाणे ।।७७।। ध्वनीला प्रतिध्वनीचे उत्तर । किंवा आरशातील प्रतिबिंबाचा आविष्कार । दुसरे निर्मिले का खरोखर । की मूळ तेथेचि आहे ।।७८।। कल्पनेने माझ्या शुद्ध स्वरूपात । जो पाही अवघे भूतजात । ते त्याच्या कल्पनेने तेथे दिसत। भासचि की अवघा ।।७९।। मग तोचि कल्पना थांबवित । भूतजात आधीच सरत। तसे स्वरूप पाही उरत । निखळ माझे ।।८०।। जसे घेरी येता दिसती। फिरताना वस्तु आपल्या भोवती । तशी कल्पनेने भूते भासती । माझ्या ठायी ।।८१।। कल्पना बाजूस ठेवून पाहिले। तर मी भूतांत, भूते माझ्यात असले । स्वप्नातही कल्पिण्याजोगे नुरले । पाही काही ।।८२।। 'मी प्राण्यांना धारण करितो । मी त्यांच्यामध्ये असतो' । असंबद्ध ताप चढलेला बोलतो । तसे बोल समज हे ।।८३।। म्हणुनी प्रिय अर्जुना ऐक । मी विश्वाचा विश्वात्मा एक । मी या मिथ्या जगाचा देख । आश्रयस्थान ।।८४।। सूर्यकिरणांमुळे मृगजळ भासे । परि ते मिथ्या असे । त्या किरणांसम मी सत्य असे । जग मिथ्या मृगजळ ।।८५।। मी असा जगाचा आधार । सर्व जगी माझा वावर । जसा सूर्य आणि प्रभेचा प्रकार । ते एकचि असती ।।८६।। हा आमचा ऐश्वर्ययोग । चांगला समजला का सांग । जगी भेदांचा

भाग। आता कुठे उरला ।।८७।। म्हणुनी माझ्यापासून कोणी । भिन्न नसती प्राणी । कुणा प्राण्यापासून जाणी । मीही नसे वेगळा ।।८८।।

आकाशात महान् वायु, राही, सर्वत्र जातसे ।
भूते माझ्यात ही सर्व, राहती, समजून घे ।।भावगीता.६।।

आकाश जेवढे असे । वारा तेवढाचि असे । हालविता वेगळा भासे । अन्यथा आकाशचि तो ।।८९।। माझ्या ठायी प्राणी पाही । तसे कल्पिल्या भासती काही । निर्विकल्प राहिल्या नाही । फक्त मी उरे सर्वत्र ।।९०।। असणे नसणे भूतमात्राचे । हे कौतुक पहा कल्पनेचे । कल्पना केल्या असे । न केल्या नाही ।।९१।। कल्पना करणारा गेला । मग जगाचा व्यवहार कुठला । म्हणुनी नीट पाहिजे पाहिला । तू हा ऐश्वर्ययोग ।।९२।। अशा प्रचीतिबोधाच्या सागरी। उडी घेतलीस जरी । मग दिसेल चराचरी । तूच आहेस ।।९३।। या ज्ञानाची तुला जाग । आली ना आता सांग । द्वैताचे स्वप्न संपले ना मग । देव म्हणती अर्जुना ।।९४।। पुन्हा कधी पुढे बुद्धीस । कल्पनेची झोप आल्यास । पुन्हा स्वप्नी पडल्यास । अद्वैताची जाग जाईल ।।९५।। म्हणुनी झोप सदाची जाईल । निखळ बोधाची जाग राहील । याचे वर्म कसे सापडेल । ते मी पुढे सांगेन ।।९६।। तरी हे धैर्यधरा अर्जुना । लक्ष देऊन करी श्रवणा।

माया निर्मिते प्राणिमात्रांना । तीच करिते नाश ।।९७।।

कल्पान्ती होत जी भूते, लीन प्रकृतीत माझिया ।
प्रकृतीतून निर्माण, कल्पारंभी करी पुन्हा ।।भावगीता.७।।

प्रकृती हे नाव जिचे । दोन प्रकार असती तिचे । एक भेद आठ प्रकारचे । दुसरा जीवरूप ।।९८।। हा अष्टधा प्रकृतीचा विचार । ऐकलास पूर्वी सातव्यात सविस्तर । म्हणून कशाला वारंवार । सांगावा तुला ।।९९।। महाकल्पाचा अंत होता । ही सर्व भूतमात्रे परतता । माझ्या या प्रकृतीशी ऐक्यता । पावती अंती ।।१००।। ग्रीष्माच्या कडाक्याच्या उन्हात । गवत भाजे बीजासकट । विलीन होय भूमीत । तसे होय ।।१०१।। किंवा वर्षाऋतु संपता। शरदाचा आरंभ होता। मेघ आकाशीचे आकाशी विरता । दिसेनासे होती ।।१०२।। किंवा आकाशाच्या घरा । लोप पावतसे वारा । तरंग येती आकारा । परी लाटेत जसे विरती ।।१०३।। जसे जाग येता क्षणी । मनीचे स्वप्न विरे मनी । जे येते प्रकृतीतुनी । ते प्रकृतीत विरते युगान्ती ।।१०४।। पुन्हा युगारंभी पहावी । तरी मीच निर्मितो सृष्टी नवी। याविषयी आता ऐकावी । खरी मूळ कथा ।।१०५।।

प्रकृती-आधीन सृष्टी ही, भूतमात्र तसे असे ।
स्वाधीन प्रकृती करुनी, निर्मितो मी पुनःपुन्हा ।।भावगीता.८।।

अर्जुना मी माया अंगिकारी । सहज स्वेच्छेने स्वीकारी । वीण असे ज्यापरी । वस्त्राच्या सुतात ।।१०६।। मग आधारे त्या विणीच्या । भरती चौकटी तंतूंच्या । तैशी आकारे महाभूतांच्या । मार्गी माझी माया ।।१०७।। पातळ दुधास लागता विरजण । आटून दही होते जाण । प्रकृती धरिते सृष्टीपण । महाभूताकारे ।।१०८।। बीजाला पाण्याची जवळीक। झाल्या तेचि होते फांदी एकेक । तसे प्राणिमात्र प्रत्येक । आहे मला ।।१०९।। राजाने वसविले नगर । हे म्हणती घरोघर । परी राजा शिणे काय खरोखर । पहा बरे अर्जुना ।।११०।। मी प्रकृतीचा अंगीकार करी । कसा असे म्हणशी जरी । स्वप्नातला जागृती धरी । एकचि मनुष्य ।।१११।। तरी स्वप्नातून जागृतीस येता। काय पाय दुखती पंडुसुता। आणि स्वप्नामध्ये असता । प्रवास घडतो काय ।।११२।। या सगळ्याचा अभिप्राय । म्हणसी जरी काय। भूतसृष्टीचे काही कार्य। न करणे लागे मला ।।११३।। जशी राजाच्या सान्निध्यावरी। प्रजा आपुलेआपुले कार्य करी । तसे प्रकृतीसंगे मी राही जरी ।

तरी तीच करी सर्व ।।११४।। जशी पूर्णचंद्राच्या भेटीसाठी । समुद्राला येते भरती । त्यात चंद्राला काय कष्ट पडती । सांग बरे अर्जुना ।।११५।। लोखंड जड निर्जीव असुनी । हाले अपुल्या जागेवरुनी । चुंबकाच्या जाता जवळुनी । त्यात चुंबकास कष्ट कुठले ।।११६।। किंबहुना यापरी । मी प्रकृतीला अंगीकारी । तेव्हा ती सृष्टिनिर्मिती करी । सततचि ।।११७।। या प्राणिमात्रांचे जीवन । असे प्रकृतीच्या आधीन । जशी भूमीवरी अवलंबून। बीजवेलपाने ।।११८।। जशा बालवृद्ध अवस्था घडती । देहाच्या आधारे राहती । किंवा वर्षाऋतूमुळे येती । मेघ आकाशी ।।११९।। झोप हे स्वप्नाचे कारण । तशी प्रकृती ही जाण । ती सर्व भूतमात्राचे कारण । तीच त्याची स्वामिनी ।।१२०।। स्थावर वा जंगम । स्थूल असो वा सूक्ष्म । केवढेही असो भूतग्राम । प्रकृतीच त्याची मूळ ।।१२१।। म्हणून सर्वांचे सृजन करावे । किंवा निर्मिलेले सांभाळावे । काही यांतले न लागे पहावे । मला कोठे ।।१२२।। पाण्यात दिसती चांदण्यांच्या वेली । ती वाढ चंद्राने नाही केली । तशी जगाची कर्मे दूर राहिली । माझ्यापासून ।।१२३।।

उदासीन सदा तैसा, तटस्थ नित राहतो ।
म्हणुनी न बांधती कर्मे, मज कुठली धनंजया ।।भावगीता.९।।

समुद्रपाण्याचा लोट फुटला । मिठाचा बांध न थांबवू शके त्याला । तशी कर्मे शेवट पावती मला । ती मला काय बांधती ? ।।१२४।। धुराच्या कणांचे छत । जर वाहत्या वाऱ्यास थांबवीत । अंधार प्रवेश करी सूर्यबिंबात । तर कर्मे मज बांधतील ।।१२५।। पावसाच्या धारांनी न बिघडे । पर्वताच्या हृदयी जे दडे । तशी प्रकृतीची कर्मे उदंडे। तरी न बाधती मज ।।१२६।। एरवी प्रकृतीच्या या जगात । मीच एक खरा होत । पण उदासीनाप्रमाणे ना करीत। ना करवीत काही ।।१२७।। जसा दिवा ठेविला घरी । कोणाला न म्हणे करी वा न करी । कोण कुठले काम करी । तेही न जाणे ।।१२८।। घरच्या व्यवहारांचे कारण । असून, राही साक्षी होऊन । तसा सर्व ठिकाणी असून । मी उदासीन असे ।।१२९।। पुन्हा पुन्हा हेच म्हणणे । सांगावे किती प्रकाराने । आता अर्जुना समजून घेणे । एकदा पहा असे ।।१३०।।

माझ्या अध्यक्षतेखाली, चराचर निर्मि प्रकृती ।
तिचा स्वभाव बदलाचा, त्यामुळे बदलते जग ।।भावगीता.१०।।

ते असे की जसा सूर्य । सर्व व्यवहाराचे कारण होय । तशी जगाची उत्पत्ती होय । माझ्यामुळे ।।१३१।। मी धारण करितो प्रकृती । म्हणुनी चराचर संभवती । जरी प्रकृती पुढे निर्मिती।

सर्वांची करी ।।१३२।। या विचारांच्या उजेडात । न्याहाळी ऐश्वर्ययोग समस्त । माझ्या ठिकाणी सर्व भूते होत । परी मी भूती असेना ।।१३३।। किंवा ना भूते माझ्यात । ना मी कुठे भूतांत । या खुणांनी तू जा पाहात । चुकू नको कधी ।।१३४।। हे सर्वस्व माझे गूढ। परंतु दाखविले तुला उघड । आता अनुभव घेई गोड । अंतर्मुख होऊनी ।।१३५।। हे वर्म न कळे ज्याला । स्वरूप माझे खरे न सापडे त्याला । जसा कोंडा शोधिता कोणाला । दाणाही न सापडे ।।१३६।। एरवी कळले वाटते तर्काने । स्वरूप माझे खात्रीने । परंतु मृगजळाच्या ओलाव्याने । काय भिजे जमीन ।।१३७।। जाळे पसरले पाण्यात । चंद्रबिंब सापडले दिसत । काठी जाळे झाडता त्यात । बिंब कोठे असते सांग ?।।१३८।।तसे वक्तृत्वाच्या कौशल्याने । प्रचीती भासविती प्रतिपादने । परी परीक्षा होता अनुभवाने । खरे न ठरे, ना पुढे खरे होई ।।१३९।।

नियंता, प्रभु सृष्टीचा, असुनी नच जाणती ।
मनुष्य देहधारी मज, मूढ ते लोक मानती ।।भावगीता.११।।

जरी संसाराची वाटे भीती । खरेच व्हावी माझी प्राप्ती । तरी म्हणणे अवश्य ठेवावे चित्ती।

जपून माझे ।।१४०।। अन्यथा कावीळ झालेले डोळे । म्हणती चांदण्या पिवळे । तसे पाहाल दोष सगळे । माझ्या शुद्ध स्वरूपातही।।१४१।। तोंड बिघडले तापाने । दुधाला कडू विष म्हणे । तसे होईल मला मनुष्य मानणे । मी मनुष्य नसता ।।१४२।। म्हणूनि तू धनंजया। जरी विसरशी माझ्या अभिप्राया । तरी स्थूल दृष्टीने वाया । जाशील पुढे ।।१४३।। मला देहबुद्धीने, स्थूल दृष्टीने । उपयोगी नसे पाहाणे । जसे स्वप्नात अमृत पिणे । अमर करी ना ।।१४४।। एरवी मूढ ओळखती स्थूल दृष्टीने । ठाम जाणती त्यांच्या परीने । आड येते असले जाणणे । जाणण्याच्याच ।।१४५।। नक्षत्रांची प्रतिबिंबे पाहून । हंस पाण्यात जाई धावून । चोची मारमारून । करितो आत्मघात ।।१४६।। गंगा म्हणुनी मृगजळाजवळ । आल्यास काय फळ । कल्पवृक्ष म्हणुनी गेला बाभळीजवळ। तरी मिळेल का काही ? ।।१४७।। नीलमण्यांचा दुपदरी हार । समजुनी साप उचलण्या व्हावे तयार । रत्ने म्हणुनी वेचिल्या गार । काय होईल ? ।।१४८।। गुप्तधन प्रकट झाले । म्हणुनी खैराचे निखारे पदरी घेतले । पाहुनी प्रतिबिंब विहिरीतले। जशी उडी घ्यावी सिंहाने ।।१४९।। समजोनि मला देहधारी । जे निश्चयाने वावरती प्रपंचव्यापारी । त्यांनी प्रतिबिंब घेतले करी ।

खरा चंद्र समजुनी ।।१५०।। अशी खात्री वाया जाते । जसे कुणी पेज पिते । आणि परिणाम पाहू जाते । अमृत पिण्याचा ।।१५१।। मला आपुल्या चित्ती । जे नाशिवंत स्थूल समजती। तरी ते कसे पाहू शकती । अविनाशी स्वरूप माझे ।।१५२।। पूर्वेच्या वाटेने कुणी चालून। पोचतो का पश्चिमसमुद्राला जाऊन। नुसता कोंडा कांडून । दाणा मिळे का ?।।१५३।। आकाराला आलेले स्थूळ । शरीर हेचि मी असे केवळ। फेस पिता मिळेल का जळ । पहा बरे कोणा ? ।।१५४।। मनाला भ्रम झाल्यावरी । मला मानिती देहधारी । जन्मकर्मे लादती सारी । पहा माझ्यावरी ।।१५५।। अनाम असुनी नावे देती । अक्रिय असुनी सक्रिय म्हणती। विदेह असुनी देहधर्म करिती । मला लागू ।।१५६।। निराकार असुनी देती आकार। करिती पूजादी उपचार । शास्त्रांपलीकडे असुनी आचार । बंधने मज लाविती ।।१५७।। वर्ण नसता वर्ण ठरविती। गुणातीत असता सगुण मानिती। हातपाय नसता समजती । अवयव मला आहेत ।।१५८।। मापापलीकडे असता मोजती । सर्वत्र असुनी माझी स्थाने निर्मिती । स्वप्नात जसे पाहती । अरण्ये कुणी ।।१५९।। अरूपाला रूप देती। श्रवण नसता कान कल्पिती । पाहाणे नसता डोळे देती । जन्म नसता गोतावळा ।।१६०।। व्यक्ती मानिती अव्यक्तासी। इच्छा असते मज निरिच्छासी । तृप्ती मानिती स्वयंतृप्तासी ।

अपुल्या कल्पनेने ।।१६१।। मला अनावरणाला प्रावरण । भूषणातीताला देती भूषण । सर्व निर्मितीचे कारण । असुनी मलाचि निर्मिती ।।१६२।। सहज असुनी मला घडविती । स्वयंभू असुनी प्राणप्रतिष्ठा करिती । सदैव असता आवाहिती। विसर्जनही करिती ।।१६३।। मी सर्वदा एकरूप स्वत:सिद्ध । परी समजती बालतरुणवृद्ध। मानिती अवस्थाबद्ध । मला कितीक ।।१६४।। मला अद्वैताला दुजा म्हणती । अकर्त्याला कर्ता मानती । मी भोगितो भोग असे म्हणती । मज अभोक्त्याला ।।१६५।। कुळ नसता कुळ वर्णिती । नित्य असुनी निधने शिणती । मला शत्रुमित्र असती असे मानिती । मी सर्वांतरी असुनी ।।१६६।। असता मी स्वानंदी सदैव रममाण । म्हणती बसलो सुखेच्छा धरून । सर्वव्यापी सम असून । म्हणती येथे आहे तेथे नाही ।।१६७।। व्यापून असता चराचर । म्हणती घेतो कुणाचा कैवार । म्हणती कुणा देतो मार । असलेचि वर्णिती ।।१६८।। अशा गोष्टी समस्त । ज्या सामान्य मनुष्य करित। त्या मीही करतो ऐसे विपरीत। ज्ञान अशांचे ।।१६९।। दिसता मूर्तीची आकृती । तेवढाचि देव म्हणून भजती । पुढे ती भंगता टाकिती । देव गेला म्हणून ।।१७०।। मनुष्यासमान मला समजले । इतक्या प्रकारे जरी भजले । तरी असल्या विपरीत ज्ञानाने झाकले। माझे खरे स्वरूप ।।१७१।।

आसुरी जे स्वभावाने, मोहाने ग्रस्त जाहले ।
आशा, कर्मे, ज्ञान, चित्त, त्यांचे विफल होतसे ।।भावगीता.१२।।

पावसाळा नसतानाचे ढग । मृगजळातले तरंग । तसे वायाचि जन्म बघ । विपरीतज्ञानियांचे ।।१७२।। किंवा मातीचे घोडेस्वार । जादूने केलेले अलंकार । कल्पनेतील नगरांचे परिसर। तसे हे व्यर्थ ।।१७३।। जसे निवडुंग पोकळ असावे । वरी फळही न यावे । शेळीच्या गळ्यातले व्यर्थ असावे । स्तन जसे ।।१७४।। तसे अविचारी लोकांचे जिणे । तयांचे कर्मे करणे । सावरीचे फळ देणे घेणे । उपयोगी नसे ।।१७५।। असे अज्ञानी लोकांचे शिकणे। माकडाहाती नारळ देणे । आंधळ्याहाती मोती पडणे । तसे व्यर्थ ।।१७६।। अशांनी निर्मिलेले शास्त्र । बालिकेच्या हातीचे जणु शस्त्र । किंवा अपात्राच्या कानी मंत्र । सांगावा तसे व्यर्थ ।।१७७।। तशी त्यांनी अशुद्ध चित्ताने । जी जी मिळविली ज्ञाने । जी जी केली आचरणे । ती ती वाया ।।१७८।। तमोगुणाची जणु राक्षसी असते । जी सद्‌बुद्धीला गिळते। विवेकालाही नष्ट करिते । ही निशाचरी ।।१७९।। जे आसुरी प्रकृतीच्या होती आधीन । चिंतेच्या गालांमधून । तमोराक्षसीच्या मुखी पडून । जाती पहा ।।१८०।। मुखी आशेच्या

लाळेत । हिंसा जीभ लोळत । संतोष चघळून नष्ट करित । जी राक्षसी सदा ।।१८१।। निघे जी ओठ चाटीत । अनर्थाच्या कानापर्यंत । दरीच ती वाटत । प्रमादपर्वतीची ।।१८२।। द्वेषाच्या दाढा तोंडात । ज्ञानाचा चुराडा करीत । मूर्खांचे जी आवरण होत । अगस्तीच्या कुंभाप्रमाणे ।।१८३।। आसुरी प्रकृतीच्या तोंडात । जे घास होऊन जात । बुडती भ्रमाच्या कुंडात । भुताला बळी द्यावा तसे ।।१८४।। अंधाराच्या गर्तेत असे पडले । ते विचाराच्या हाती न लागले । असो ते जेथ गेले । तिथून परतणे कठीण ।।१८५।। असो हे निष्फळ का बोलावे । मूर्ख कशाला वर्णावे । वाणीने का जावे । व्यर्थ शिणून ।।१८६।।

आदिकारण-अव्यय हे, स्वरूप मम जाणती ।
सद्‌गुणी महात्मे थोर, अनन्य भजती मज ।।भावगीता.१३।।

असे कृष्ण बोलता । अर्जुन म्हणे असू दे ते आता । कृष्ण म्हणती आता ऐक साधुकथा । जिथे वाचेस विसावा।।१८७।। ज्यांच्या निर्मळ मनात । मी सर्व सोडून नित्य राहात । जे निजले तरी करीत । वैराग्य त्यांची उपासना ।।१८८।। ज्यांच्या आस्थेच्या सद्‌भावनात । धर्म राज्य करीत । विवेक जगतो ओलाव्यात । ज्यांच्या मनांच्या ।।१८९।। जे ज्ञानगंगेत

न्हाले । पूर्णता जणू जेवले । जे जणू शांतीची झाले । पालवी नवी ।।१९०।। कोंभ जे पूर्णतेचे । खांब जे धैर्यमंडपाचे । माठ जे आनंदसमुद्राचे । भरून ओसंडलेले ।।१९१।। ज्यांनी मिळवली एवढी भक्ती । ते मोक्षालाही बाजूला सर म्हणती । ज्यांच्या वागण्यात नीती । प्रत्यक्ष जगते ।।१९२।। सर्व इंद्रिये ज्यांची । लेणी घालती शांतीची । गवसणी मज व्यापकाची । ज्यांचे चित्त झाले ।।१९३।। महापुरुष जे असे अनुभवाचे । ते भाग्य दैवी प्रकृतीचे । सर्वत्र स्वरूप माझे । हे जाणून राहाती ।।१९४।। भक्तभगवंत दुजेपण। मनाला न शिवे जाण । वाढते प्रेम अंतरी धरून । भक्ती माझी करिती ।।१९५।। भगवंत होऊन पांडवा। करिती माझी सेवा । नवलाचा प्रकार वर्णावा । भक्तीचा, तो ऐक ।।१९६।।

भक्तीने शरण येऊनी, उपासक-व्रती-तपी ।
राहूनी जोडले सतत, कीर्तने भजती मज ।।भावगीता.१४।।

जग करिती कीर्तनमय । प्रायश्चित्तांचे बंद पडती व्यवसाय । पापचि न होता उपाय । कशाचा करावा ? ।।१९७।। यमदमांना अवकळा आली । तीर्थांची महत्त्वे ओसरली । कीर्तनाने यमलोकाची थांबली । येरझार ।।१९८।। यम म्हणे कशाचा निग्रह करू। दम म्हणे कशाचे दमन करू। तीर्थे म्हणती काय करू। निर्दोष माणसाचे आम्ही ? ।।१९९।। माझा नामघोष

करिती । त्याने विश्वाची दु:खे हरती । ब्रह्मानंदे भरून टाकिती । जग सारे ।।२००।। पहाटेविना प्रकाश देती । अमृताविना अमर करिती । योगाविना मोक्ष दाखविती । प्रत्यक्ष डोळ्यांना ।।२०१।। राजारंक भेद न करिती । लहानथोरपण आड न आणिती । आनंदाचे दान देती । सर्व जगा ।।२०२।। पूर्वी एखादा वैकुंठी जाई । यांनी येथेचि वैकुंठ वसविले पाही । संकीर्तने उजळल्या दिशा दाही । प्रकाशित विश्व ।।२०३।। तेजाला सूर्यासमान दिसत। परि अस्ताने तो दोषयुक्त। चंद्र पूर्ण एकदाचि असत। हे सदा पूर्ण ।।२०४।। ढग उदार परि ओसरतो । उपमेला न पुरतो । हा महात्मा उदार कृपाळू शोभतो । सिंहासारखा ।।२०५।। हजारो जन्मी कष्टावे । तेव्हा एकदा नाम मुखी यावे । ते माझे नाम आनंदे नाचावे । वाचेपुढे यांच्या ।।२०६।। तो मी वैकुंठात नसे । एक वेळ सूर्यातही नसे। हृदये ओलांडून जातसे । योग्यांचीही कधीकधी ।।२०७।। कधी हरवलो तरी सापडेन । अशा महात्म्यांच्या हृदयी जाण । जे सदैव तल्लीन । माझ्या नामघोषी ।।२०८।। माझ्या वर्णनी तृप्त झाले । देशकाळाला विसरले । कीर्तनसुखाने स्वरूप झाले । आपणचि ।।२०९।। कृष्णविष्णुहरिगोविंद। या नामांचा सांगती आनंद । त्यात आत्मचर्चा विशद । उदंड करिती ।।२१०।। असे असो हे अर्जुना । माझ्या कीर्तीच्या गात संकीर्तना । संचार

करिती पहा ना । हे महात्मे अखंड ।।२११।। काही असे आहेत । जे तत्परतेने वाटेत घेत। पंचप्राण मन सांगात । वाटाडे बरोबर ।।२१२।। यमनियमांची कुंपणे घालुनी । आत वज्रासन लावुनी। वरी तोफा ठेवुनी । प्राणायामांच्या ।।२१३।। कुंडलिनीच्या प्रकाशात । मनवायूंच्या मदतीत । सतराव्या जीवनकलेचे हस्तगत । तळे ज्यांनी केले ।।२१४।। प्रत्याहाराने पराक्रम केला । विकारांचा जोर संपविला । इंद्रियसमूह बांधून आणिला । हृदयाआत ।।२१५।। धारणेचे घोडे सरसावले । महाभूतांना एकत्र आणिले । संकल्पाचे सैन्य पराभूत केले । चतुरंग असुनी ।।२१६।। जय रे जय झाला । ध्यानाचा डंका वाजला । स्वरूपाशी ऐक्य पावला । योगी त्यानंतर ।।२१७।। समाधीलक्ष्मीचे सुख । त्याचा त्याला झाला राज्याभिषेक । माझ्याशी ऐक्य झाला कोणी एक। असा योगी ।।२१८।। योग्यांची ही भक्ती गहन । तेव्हा आता सांगेन । अर्जुना जे माझे भजन । सोपे एक दुसरे ।।२१९।। जसा वस्त्रांच्या दोन्ही पदरी । एकच तंतू आतबाहेरी। तसा मी भरलो चराचरी। हे ते जाणती ।।२२०।। ब्रह्मापासून चिलटापर्यंत । माझेच स्वरूप समस्त । हे जाणून वर्तत। सदा ते ।।२२१।। मग लहानथोर न म्हणती ।

सजीवनिर्जीव भेद न करिती । दिसे त्यास नमन करिती । मीच म्हणून ।।२२२।। आपुली श्रेष्ठता विसरती । समोरचे पात्रअपात्र न म्हणती । दिसे त्याला वंदन करिती । नमन आवडोनी ।।२२३।। उंचावरून पाणी पडते । सखल भागी सहज जाते । तसे सहज नमन घडते । त्यांचे स्वाभाविक ।।२२४।। फळांनी फांदी लगडते । तेव्हा जमिनीकडे सहज लवते । नम्र होतात सहज ते । सर्व जीवमात्रांसमोर ।।२२५।। जे अखंड निगर्वी असती। नम्रता हीच त्यांची संपत्ती । ती माझा जयजयकार करून अर्पिती । मलाचि ते ।।२२६।। नमने मानाभिमान गळाले । ते सहजचि मी झाले । निरंतर एकरूप होऊन चाले। उपासना त्यांची ।।२२७।। जे करिती नमना । श्रेष्ठ भक्ती त्यांची सांगितली अर्जुना । आता ऐक ज्ञानयजना। जे भक्त करिती ।।२२८।।

अनेक कधि वा एक, विश्वरूपे कुणी तसे ।
कुणी ते ज्ञानयज्ञाने, साधिती मम उपासना ।।भावगीता.१५।।

ही भक्तीची हातोटी । पूर्वी चौथ्यात सांगितली होती । तू जाणतोसी किरीटी । मागील वर्णन ।।२२९।। तेव्हा अर्जुन म्हणे असेल देवा । जरी ऐकिले पूर्वी केव्हा । तरी अमृताचा प्रसाद

पुरे म्हणावा । असे कसे घडेल ।।२३०।। हे ऐकून भगवंताने । अर्जुनाच्या ऐकण्याच्या उत्सुकतेने । आनंदित होऊनी संतोषाने । मान डोलविली ।।२३१।। पार्था हे बोललास किती बरे । अन्यथा बोलण्याची वेळ नव्हे हे खरे । तुझ्या आस्थेने मला सारे । बोलविते केले।।२३२।। अर्जुन म्हणे हे काय बोल । चकोरासाठी का उगवे चंद्र शीतल । जगा सदैव शांत करील । हा स्वभाव त्याचा ।।२३३।। चोच धरितो आम्ही चकोर । अमुच्यासाठीच तुम्हांसमोर । आपण कृपासिंधू थोर । म्हणुनी थोडे विनवितो ।।२३४।। चातकाची केवढीशी तहान । परी मेघ बरसे महान । तहानलेले अवघेचि जन । उदारपणे शांत करी ।।२३५।। एक घोट पाणी हवे । तरी गंगेलाचि लागे जावे । तसे देवा आपणचि सांगावे।हवे केवढेही असो ।।२३६।। देव म्हणती तुझ्या आस्थेने पाहे । आनंद जो भरला आहे । स्तुतिसुमने ठेवण्या न राहे । आता कोठे जागा ।।२३७।। तुझे ऐकणे असे उत्तम। वक्तृत्व घडविण्याचे करिते काम । कौतुक अर्जुनाचे करुनी पुरुषोत्तम । पुढे बोलू लागले ।।२३८।। ज्ञानयज्ञ असा आहे । आद्यसंकल्प पशुखांब आहे । महाभूतांचा मंडप पाहे। द्वैत हा पशू ।।२३९।। महाभूतांचे विशेष गुण । अथवा इंद्रिये आणि प्राण । यज्ञाची सामग्री जाण। अज्ञानाचे तूप ।।२४०।। मनबुद्धीच्या कुंडात । ज्ञानाग्नी धगधगत । द्वंद्वसमता जी

चित्तात । तीच यज्ञवेदी।।२४१।। बुद्धीचे कौशल्य ज्या विवेकात । तो मंत्रविद्येचा गौरव शोभत । शांती यज्ञपात्र होत । जीव यज्ञकर्ता ।।२४२।। प्रत्यक्ष अनुभवाच्या पात्रात । विवेकाच्या महामंत्रात । होतसे ज्ञानयज्ञात । नाश पहा द्वैताचा ।।२४३।। अज्ञानाचे तूप जळुनी जाते । यज्ञकर्ता यज्ञकर्म थांबते । अवभृथस्नान घडते । जिवशिव ऐक्य पाण्याने ।।२४४।। महाभूते, इंद्रिये, विषय । काहीच वेगळे न म्हणे होय । एकत्वाला अवघे जाय। आत्मबुद्धीमुळे ।।२४५।। जसा जागा झालेला अर्जुना । म्हणे स्वप्नातली विचित्र सेना। मीच झालो होतो ना । निद्रावश होऊन ।।२४६।। आता ती सेना नाही । पण जागेपणी मीच आहे सर्वही । अशा एकत्वाने सर्वांस पाही । जागा असता ।।२४७।। मी वेगळा जीव नाही । ब्रह्मापासून एक सर्वही । अशा भावाने सर्वत्र पाही । ज्ञानयज्ञ होता ।।२४८।। किंवा अनादिकाळापासून । अनेकत्व भरले जाण । नामरूपे भिन्नभिन्न । तेव्हापासून आहेत ।।२४९।। म्हणून विश्व जरी झाले भिन्न । तरी भिन्न नसे त्याचे ज्ञान । जसे अवयव असती भिन्न । पण एकाच देहाचे ।।२५०।। जशा फांद्या लहानथोर। पण एकच तरुवर । किरणे अनेक, पण दिनकर । एकच असे ।।२५१।। तशा वेगवेगळ्या व्यक्ती । वेगळी नावे, वेगळी वृत्ती । पण सर्वांच्या ठिकाणी जाणती । एकच मी आहे ।।२५२।।

जे ज्ञानयज्ञ करिती । ते हे वेगळेपण पाहाती । परी या भेदा न भुलती । एकत्व जाणती म्हणून ।।२५३।। किंवा ते पाहती जे काही । ते माझ्याशिवाय दुसरे नाही । माझेचि स्वरूप सर्वही । हे सदा जाणती ।।२५४।। बुडबुडा जेथे जाय । तेथे पाणीच संगती होय । तो राहे अथवा विरून जाय । तरी पाणीच होय ।।२५५।। वारा उचलतो पृथ्वीचे कण । त्यांना न ये वेगळेपण । पुन्हा पृथ्वीवर गेले पडून । तरी पृथ्वीकणचि ।।२५६।। तसे कोणी कुठल्या भावे । कुणी व्हावे वा न व्हावे । तरी मीच आहे सर्वत्र जाणवे । त्याला पाहा ।।२५७।। अर्जुना जेवढी माझी व्याप्ती । तेवढी त्यांची प्रचीती । अनेकविध होऊन वर्तती । मी अनेकविध होता ।।२५८।। आवडे ज्यांना समोर । त्यांना तसाचि असे दिनकर । तसे मद्रूप विश्व समोर । त्यांच्या सदा असे ।।२५९।। पहा त्यांच्या ज्ञाना । पाठीपोट नाही अर्जुना। वारा जसा गगना । सर्वांगी असे ।।२६०।। तसा मी जसा जेवढा । सद्भाव त्यांचा तेवढा । अनुभव जगता एवढा। भजन वेगळे न करिताचि होय ।।२६१।। जरी मीच सर्व आहे । उपासनेविना कसा कोण राहे । काहींना न कळते हे । त्यांची उपासना न होय ।।२६२।। असो या उचित रीती । जे ज्ञानयज्ञाने मला भजती । ते माझीच उपासना करिती।

ते तुला सांगितले ।।२६३।। सर्वांच्या मार्गाने कर्म होय । ते सर्व मलाच मिळून जाय । कर्म प्राप्त न होय । हे न ओळखणाऱ्यांचे ।।२६४।।

पितृयज्ञ, अन्य यज्ञ, आहुत्या, मंत्र, औषधी ।
तूप, अग्नी, यज्ञकर्मे, तेही सर्वच मी असे ।।भावगीता.१६।।

हे जरी कळू लागेल । तरी मुळात वेद मीच हे कळेल । तो ज्या कृती सांगेल । त्याही मीच ।।२६५।। मग त्या कृतींपासून चांगले । जे सांगोपांग यज्ञ घडले । तेही स्वरूप माझे झाले। पहा हे अर्जुना ।।२६६।। स्वाहा देवांच्या आहुती । स्वधा पितरांच्या आहुती । तूप, समिधा, सोम होती । त्या तसे, मंत्रही मीच होय ।।२६७।। हवनकर्ता तसे हवनही । तेथील अग्नी तोही । साऱ्या हवनवस्तू त्याही । माझेचि रूप ।।२६८।।

जगाचा मी पिता माता, आजोबा, धारकहि असे ।
जाणण्यायोग्य ओंकार, ऋक्साम यजुही असे ।।भावगीता.१७।।

ज्याच्या अंगसंगाने । अष्टांग प्रकृतीपासून जन्मणे । जगास आहे आकारणे । तो जगत्पिता मीच ।।२६९।। अर्धनारीनटेश्वरात । तोचि पुरुष स्त्रीही होत । तसा मी चराचरात ।

माताही होय ।।२७०।। जन्मलेले जग ज्यात राहे । ज्याने ते जग वाढत आहे । त्याचा आधार मीच आहे । खरोखर ।।२७१।। मनरूप नसलेल्या मनी । संकल्पिली प्रकृतीपुरुष दोन्ही । तो आजोबा त्रिभुवनी । या विश्वाचा मी ।।२७२।। सर्व ज्ञानाच्या वाटा येतात । ज्या गावी एक होतात । तेथील वेदाच्या चौकात । ज्याला वेद्य म्हणती ।।२७३।। जेथे नाना मते एक झाली। शास्त्रे एकमेका ओळखू लागली । वाट चुकलेली ज्ञाने एकत्र झाली । ज्याला पवित्र म्हणती ।।२७४।। जो ब्रह्मबीजाचा अंकुर । घोषध्वनीनादाकार । त्यांचे मंदिर ओंकार । तोही मीच ।।२७५।। ज्या ओंकाराच्या कुशीतुनी । अउम अक्षरे तीन्ही । आली तीन वेदांस घेउनी । उपजताचि ।।२७६।। म्हणुनी ऋग्यजु:साम । हे तीन्ही मीचि आत्माराम । आरंभ मीच पुरुषोत्तम । शब्दकुळाचा ।।२७७।।

प्राप्तव्य, पोषणकर्ता मी, साक्षी, आश्रय अन् सुहृत् ।
उत्पत्तिलय सृष्टीचे, बीज शाश्वत मी असे ।।भावगीता.१८।।

हे चराचर विसावते । ज्या प्रकृतीत साठवते । तीच शिणता विसावते । माझ्या ठिकाणी ।।२७८।। ज्याच्या आधारे प्रकृती जगते । अवघे विश्व प्रसवते । प्रगटुनी त्रिगुणास भोगितो ते । मीच या प्रकृतीतुनी ।।२७९।। जो आधार जगाचा । तो मी मालकही तयाचा । पती

जो विश्वलक्ष्मीचा । मीच पहा अर्जुना ।।२८०।। आकाशाने सर्वत्र असावे । वाऱ्याने क्षणही उगे नसावे । अग्नीने सतत जाळावे । वर्षाव करावा पाण्याने ।।२८१।। पर्वतांनी आसने न मोडावी । समुद्रांनी मर्यादा न ओलांडावी । पृथ्वीने प्राणिमात्रे वाहावी । ही आज्ञा माझी ।।२८२।। मी बोलविल्या वेद बोलतो । मी चालविल्या सूर्य चालतो । मी हालविल्या प्राण हालतो । जो जग चालवी ।।२८३।। मी आज्ञा दिली म्हणुनी । काळ ग्रासितो प्राणी । ज्याच्या आज्ञेत राहुनी । वागती सकळ तो मी ।।२८४।। असा जो मी समर्थ । जगाचा असे नाथ । गगनासारखा साक्षिभूत । तोही मीच ।।२८५।। नामरूपाने जो जगी भरला। आधार त्या नामरूपाला । तोही मीच असे झाला । जगी अर्जुना ।।२८६।। लाटा होती पाण्याच्याच। लाटांतही असे पाणीच । जग वसवीतसे मीच । ते माझ्यातच राहतसे ।।२८७।। जो मज होय अनन्यशरण । त्याचे निवारी मी जन्ममरण । शरणागतांनी जावे शरण । असा मीच असे ।।२८८।। मीच एक अनेकपणाने । होतो स्वभावधर्माप्रमाणे । वावरतो प्राणरूपाने । सर्व जगी ।।२८९।। जसा सूर्य जाणे प्रतिबिंबणे । हा समुद्र हे डबके न म्हणे । ब्रह्मादिक सर्वांचा सुहृद होणे । मी करी तसे ।।२९०।। मीच असे अर्जुना जीवन । जगते ज्यावर त्रिभुवन । सृष्टीच्या उत्पत्तिनाशाचे कारण । तेही मीच ।।२९१।। फांद्या प्रसवती बीजापासून । बीजात

सामावे वृक्ष परतून । उत्पन्न होते संकल्पातुन । संकल्पात नष्ट होते सर्व ।।२९२।। तसा जगाचे बीज जो संकल्प । तो अव्यक्त वासनारूप । जग नष्ट होता सूक्ष्म रूप । घेउनी माझ्यात राही ।।२९३।। ही नामरूपे नाहीशी होती । वर्णव्यक्ती ना उरती । वस्तूंच्या जातींचे भेद नुरती । आकाशही लुप्त होय ।।२९४।। संकल्पात राहती वासनासंस्कार। पुन्हा रचावया आकार । टिकती जेथे होउनी अमर । ते स्थान मी असे ।।२९५।।

तापतो सूर्यरूपे मी, जल आकर्षितो तसे ।
वर्षतो मी, सदसद् मी, मृत्यु मी, अमरत्व मी ।।भावगीता.१९।।

मी सूर्याचे रूप घेऊन । टाकी सर्व आटवून । पुन्हा वर्षतो इंद्र होऊन । जलमय सर्व होय ।।२९६।। अग्नी लाकूड खातो । लाकूडच अग्नी होतो । मीच मरतो मारतो । दोन्ही स्वरूप माझे ।।२९७।। म्हणुनी ज्याचा विनाश होतो। ते रूप मीच असतो । विनाश ज्याचा न होतो । ते तरी सहजचि मी ।।२९८।। आता किती बोलून सांगावे । एकदा अवघे ओळखावे । शाश्वत अशाश्वत जाणावे । सर्व मीच ।।२९९।। म्हणुनी अर्जुना मी नसे । अशी जागा कोठे असे । पण प्राण्यांचे दुर्दैव कसे । जे न पाहती मला ।।३००।। तरंग

पाण्याविना का सुकती । किरणांना पाहण्या काय दिवे लागती । परंतु आश्चर्य हे मला न पाहती । ते मीच असुनी ! ।।३०१।। आतबाहेर माझ्याने भरले । जग माझेचि ओतले । पण काय कर्म त्यांच्या वाट्या आले । जे मीच नाही म्हणती ! ।।३०२।। अमृताच्या विहिरीत पडावे । तरी ज्यांनी स्वत:ला बाहेर काढावे । देव न दिसे त्यांचे काय करावे । असेचि असे ।।३०३।। अन्नाच्या एका घासासाठी। आंधळा धावता किरीटी । अडखळता चिंतामणीला पायाने लोटी । काय तेही न पाहता ।।३०४।। म्हणुनी ज्ञान नसता पाही । माणसाची दुर्दशा ऐशी ही । कर्मे निरुपयोगी होती पाही । ज्ञान त्यांचे न होता ।।३०५।। आंधळ्याला गरुडपंख असले । तरी उपयोगा कुठे आले । तसे सत्कर्मांचे श्रम वाया गेले । त्यांचे ज्ञान न होता ।।३०६।।

वेदाभ्यासी यज्ञकर्मी, सोम प्राशुनि पवित्र जे ।
इच्छिली स्वर्गफळे मिळती, इन्द्रलोकी तया जना ।।भावगीता.२०।।

अर्जुना पाही आचरण । जे आश्रमधर्मांचे करिती आपण । आदर्श ठरती जाण । धर्ममार्गीचे ।।३०७।। ते जेव्हा करिती यजन । तिन्ही वेद तुकविती मान । यज्ञफळे साक्षात येऊन ।

उभी ठाकती जयांपुढे ।।३०८।। असे जे यजनशील । यज्ञस्वरूप जे केवळ । परि पुण्याच्या नावे पाप सकळ । त्यांनी जोडले ।।३०९।। कारण ते तिन्ही वेद जाणती । शंभरावरी यज्ञ करिती । परि मला विसरून जोडिती । स्वर्ग पहा ते ।।३१०।। कल्पतरूच्या खाली बसल्याबसल्या । भिक्षेच्या झोळीला गाठी मारिल्या । तसे करंटेपण असे घडल्या । दरिद्रीच राही ।।३११।। तसे शंभर यज्ञांनी मला पूजिले । परि स्वर्गसुख इच्छिले । आता हे पाप की पुण्य झाले । सांग बरे ।।३१२।। मला सोडून इच्छिणे स्वर्ग । हा अज्ञानाचा पुण्यमार्ग । ज्ञानी म्हणती हा हानिमार्ग । आत्मनाशाचा ।।३१३।। एरवी नरकातले दु:ख पाहणे । म्हणून स्वर्गी मिळते त्या सुख म्हणणे । अन्यथा शाश्वत आनंद जाणणे । हे स्वरूप माझे ।।३१४।। माझ्याकडे येताना । स्वर्गनरक आडवाटा अर्जुना । चोरांच्या त्या जाणा । नेती भलतीकडे ।।३१५।। पापात्मक पुण्याने स्वर्गाला जाणे । पापात्मक पापाने नरकाला जाणे । माझी प्राप्ती होते ज्याने । ते शुद्ध पुण्य ।।३१६।। सर्व जीव माझ्यामध्ये असता । ज्याने मी दुरावतो पंडुसुता । त्याला पुण्य असे म्हणता । जीभचि झडेल ना !।।३१७।। हे असो आता अर्जुना। यज्ञाने करुनी माझी आराधना। ते मला सोडून करिती याचना । स्वर्गभोगांची ।।३१८।। त्यांच्या पापरूप पुण्याने । मी न लाभतो ज्याने । येती मात्र ते त्या

पुण्याने । स्वर्गाला पहा ।।३१९।। स्वर्गी अमरत्व हे सिंहासन । ऐरावतासारखे वाहन । राजधानीचे ठिकाण । अमरावती ।।३२०।। जेथे विविध महासिद्धींची भांडारे । भरली अमृताची कोठारे । ज्या स्वर्गात फिरती खिल्लारे। कामधेनूंची ।।३२१।। देव जेथे होती चाकर । चिंतामणींच्या जमिनी सर्वत्र । कल्पवृक्षांच्या बागा सुंदर । करमणुकीसाठी ।।३२२।। गंधर्वांची चालती गाणी।रंभा नाचती नर्तनी । रंजनास स्त्रिया विलासिनी । त्यात मुख्य उर्वशी ।।३२३।। मदन शेजारी सेवेला । चंद्र सडासंमार्जनाला । दूत निरोप द्यावयाला। वाऱ्यासारखे जेथ ।।३२४।। ब्रह्मकर्मे करण्या जाण । बृहस्पतीसम ब्राह्मण । पंगतीला येती देवगण । ज्या स्वर्गात ।।३२५।। घोडेस्वार स्वर्गीचे । ते लोकपालांच्या योग्यतेचे । अग्रभागी चालणे उचैःश्रवाचे । जो अश्व इंद्राचा ।।३२६।। असो हे वर्णन भोगांचे । जे इंद्रसुखांच्या तोडीचे । भोगता येती पुण्याचे । अंश असती तोवर ।।३२७।।

संपता पुण्य ते त्यांचे, मृत्युलोकात परतती ।
भोगेच्छे वेदकर्मांनी, येरझारा करीत ते ।।भावगीता.२१।।

पुण्याचे सरता गाठोडे । इंद्रपणाची उटी उतरे । आणि येऊ लागती माघारे । मृत्युलोका ।।३२८।। वेश्येपायी संपता धन सर्वही । हात न लावू शके तिच्या दारासही । तसे

लाजिरवाणे जिणे पाही । यज्ञकर्त्यांचे ।।३२९।। म्हणुनि मला विसरूनि । पुण्याने स्वर्ग मिळवला ज्यांनी । पुण्ये संपता स्वर्ग संपुनी। मृत्युलोकी ते परतले ।।३३०।। मातेच्या उदराच्या गुहेत । विष्ठामूत्राच्या नरकात । नऊ महिने उकडले जात । मग जन्मती मरती।।३३१।।स्वप्नात धनाचा ठेवा गवसतो । परि तो जाग येताच हरपतो । स्वर्गसुखाचा प्रकार असतो । असलाच वेदज्ञांचा ।।३३२।। धान्य टाकून कोंडा कांडिला । तो जसा व्यर्थ झाला । तसा वेदही वाया गेला । मला न जाणिता ।।३३३।। म्हणून माझ्याविना। तिन्ही वेद निरुपयोगी जाणा । मला जाणता बाकी काही नसेना । तरी सुखी होशील ।।३३४।।

चिन्तन अनन्यतेने जे, करिती, मज उपासिती ।
अशा अनन्यभक्तांचा, योगक्षेम वहात मी ।।भावगीता.२२।।

सर्वभावाने चिंतन करिती । माझेचि जे चित्ती । जसे गर्भ न जाणती । कुठला उद्योग ।।३३५।। जसे माझ्यावाचून काही । दुसरे चांगलेच नाही । जगणे म्हणजे मीच पाही । असे ज्यांना झाले ।।३३६।। चित्ताने असे अनन्यगती। होऊन मला चिंतिती। माझीच उपासना

करिती । त्यांची सेवा करी मी।।३३७।। ते ज्या क्षणी एकवटले । माझ्याच मार्गाला लागले। तेव्हाच त्यांचे ओझे पडले । पहा माझ्यावर ।।३३८।। त्यांना जे जे करावे वाटते । ते मलाचि करावे लागते । पक्षिणीस जसे जगावे लागते । पंख न फुटलेल्या पिल्लासाठी ।।३३९।। तहानभूक न कळे आपुली। त्याचे उचित ते करी माउली । ज्यांनी प्राणपणाने भक्ती केली । त्यांचे काही करावया न लाजे ।।३४०।। एकरूप व्हावे वाटे ज्या भक्तांना। मी एकरूप करतो तयांना । सेवा करावी वाटे ज्यांना । त्यांना प्रेम देतो माझे ।।३४१।।असा जो जो भाव धरिती मनात । तो तो मी त्यांचा पुरवीत । आणि दिलेल्याचे रक्षण करित। तेही मीच सदा ।।३४२।। आश्रय सर्वभावांचा । मी एकच झालो ज्यांचा । योगक्षेम अवघा त्यांचा । मीच वाहे अर्जुना ।।३४३।।

करिती अन्य देवांची, श्रद्धापूर्वक भक्ति जे ।
पोचे तीही मला पाही, नसे उचित ती जरी ।।भावगीता.२३।।

आता इतर संप्रदाय असती । ते मला न जाणती । अग्नी-इंद्र-सूर्य-सोम म्हणून करिती । यजन माझे ।।३४४।। ती पाही माझीच भक्ती । कारण मीच आहे त्रिजगती । परी सरळ

नव्हे रीती । भक्तीची ही ।।३४५।। शाखापालवी वृक्षाची । नव्हे का एकाच बीजाची । परी पाणी घेण्याची क्रिया मुळाची । तरी मुळांतच पाणी घालावे ।।३४६।।दहा इंद्रिये होती। सर्व एकाच देहात राहती । ती सेविती ते विषय जाती । एकाच ठिकाणी ।।३४७।। पण म्हणून का पक्वान्ने करावी । आणि कानाला भरवावी । किंवा फुले आणून बांधावी । का डोळ्यांवरी ।।३४८।। तेथे अन्नरस मुखाने सेवावा । सुगंध नाकानेच घ्यावा । तसा मी ओळखून भजावा । मीच म्हणुनी ।।३४९।। मला न जाणता भक्ती। करिती त्यांची कर्मे वाया जाती । म्हणुनी कर्माचे डोळे ज्ञान असती । ते निर्दोष असावे ।।३५०।।

असुनी सर्व यज्ञांचा, भोक्ता मी प्रभु मीचही ।
मला न जाणल्याने ते, भरकटती असे पहा ।।भावगीता.२४।।

अन्यथा पंडुसुता पाही । यज्ञोपचारांचा या सर्वही । माझ्याशिवाय खरा भोक्ता कुणीही । आहे का दुसरा ।।३५१।। आरंभअंत मी सकळ यज्ञांचा । असुनी विसर पडला माझा । दुर्बुद्धीने इतर देवांचा । यज्ञ हे करिती ।।३५२।। गंगेचे पाणी गंगेत जसे । अर्पावे देवपितरांच्या उद्देशे । माझे मलाच देती तसे । फक्त भाव वेगळे ।।३५३।। परी म्हणूनि पार्था । ते मला न पावती सर्वथा । मग मनात धरिली ज्यांची आस्था ।

तसे ते ते होती ।।३५४।।

उपासना जसे करिती, जाती जीव तिथे तसे ।
देवलोकी, पितृलोकी, माझे माझ्याकडे तसे ।।भावगीता.२५।।

मने, वाचा, करणी । देव भजती जे भजनी । ते शरीर पडता क्षणी । देवलोकी जाती ।।३५५।। किंवा पितरांची व्रते । देऊन करिती चित्ते । त्यांची संपल्या जीविते । पितृलोकी जाती ।।३५६।। किंवा क्षुद्र देव भुतेखेते । हीच ज्यांची परमदैवते । जारणमारण कर्मांनी ते। त्यांची उपासना करिती ।।३५७।। असे लोक जेव्हा देह टाकिती । तेव्हा भूतलोका जाती। जसे संकल्प तशी फळे येती । त्यांच्या कर्मांना ।।३५८।। जे मलाचि डोळ्यांनी पाहती । कानांने माझेच श्रवण करिती । मने मलाच कल्पिती । वाचेने वर्णिती ।।३५९।। सर्वांगाने सर्वांच्या ठायी । मलाच नमस्कार करिती पाही । दानपुण्य जे करिती काही । ते माझ्याचसाठी ।।३६०।। माझ्या ज्ञानासाठी जे अध्ययन करिती । अंतर्बाह्य माझ्याने तृप्त राहती । माझ्या लाभासाठी देती । आयुष्य जे ।।३६१।। आम्ही हरीचे हे भूषविती । तेवढ्यापुरता अहंकार वाहती । लोभही अंगी ठेविती । परी तो माझाच ।।३६२।। जे सकाम माझ्या कामनेने । सप्रेम माझ्या प्रेमाने । भ्रमती परी माझ्या भ्रमाने । ते न जाणती अन्य लोकांना ।।३६३।।

ज्यांची शास्त्रे मला जाणती। ज्यांच्या मंत्रे माझीच प्राप्ती । ते जे जे कर्म करिती । त्याने माझीच भक्ती होय ।।३६४।।मरणापूर्वीच मजकडे आले । माझ्यात मिसळून गेले । ते शरीर पडता दुसरीकडे गेले। असे कसे होईल ? ।।३६५।। म्हणून माझीच करिता भक्ती । ते येथेच पावती मुक्ती । उपचारांच्या निमित्ताने देती । स्वतःला मज ।।३६६।। स्वतःला अर्पण केल्यावीण । उपचारांनी मी न वश होय जाण । जीवभाव करिता अर्पण। आनंदे मी अर्जुना ।।३६७।। कळले म्हणतो तो न जाणे । कळलेपण हेचि त्याचे उणे । आम्ही पोचलो म्हणे। तो न पोचला कोठे ।।३६८।। म्हणे यज्ञतपदान । याने भगवंत गाठीन । त्याच्या यज्ञदानतपांना काडीहून । किंमत नसे मजपाशी ।।३६९।। ज्ञानशक्तीचे पाहता बळ । वेदांपेक्षा का कुणी सबळ । शेषाहून का वाचा बळ । अधिक कुणाचे होय ।।३७०।। तो शेष माझ्या शयनी दडे । वेद नेति नेति बडबडे । थोर सनकादिक होती वेडे । माझ्यासाठी ।।३७१।। तापसांच्या समुदायात । शंकराहून श्रेष्ठ का कुणी होत । तोही माझी चरणगंगा मिरवित । अपुल्या माथी ।।३७२।। लक्ष्मीहून ऐश्वर्यात । कुणी का सरस होत । श्रियेसारख्या दासी घरात । जिच्या असती ।।३७३।। त्यांनी खेळता घरकुले केली । त्यास अमरावती

नावे ठेविली । इंद्रादिक नव्हेत का बाहुली । होती तयांची ।।३७४।। त्यांना नावडता खेळ मोडिती । तरी इंद्राचे रंक होती । त्या ज्या वृक्षा पाहती । तो बने कल्पवृक्ष ।।३७५।। अशी जिच्या जवळच्यांची । शक्ती पहा दासदासींची । त्यांची मुख्यनायिका लक्ष्मीची । किंमत नसे मजपाशी ।।३७६।। ती अभिमान सोडुनी पांडवा । सर्वस्वाने करिता सेवा । माझे पाय धुण्याच्या दैवा । पात्र झाली ।।३७७।। म्हणून अहंकार सोडावा । ज्ञानाचा गर्व टाकावा। सर्व जगाशी नम्रभाव धरावा । त्याला मिळे जवळीक माझी ।।३७८।।प्रकाशात सूर्याच्या पाही । लोपून जातो चंद्रही । मिरवावी का लुकलुक तेथेही । काजव्यांनी अपुली ? ।।३७९।। लक्ष्मीचे थोरपण न उरे । शंभूचे तप न पुरे । तिथे सामान्यांची बुद्धी काय पुरे । मला जाणण्या ।।३८०।। यासाठी मजवरून शरीर ओवाळावे । सकळ गुणांचे लोण उतरवावे । सर्व संपत्तीचे गर्व टाकावे । कुरवंडी करून ।।३८१।।

पान फूल फळे पाणी, भक्तीने देइ जो जसे ।
स्वीकारी अर्पण आनंदे, ते काहीही असो कसे ।।भावगीता.२६।।

मग उल्हासाने निस्सीम भक्ती करावी । मला अर्पिण्यास आणावी । कसलीही फळे द्यावी।

कुठल्याही झाडाची।।३८२।। भक्त मला असे जे देतो । ते मी दोन्ही हातांनी स्वीकारतो। देठही न तोडिता सेवितो । आदराने ।।३८३।। भावाने एक फूल कुणी देतो । तरी मी आनंदुनी भुलतो । प्रेमभराने मुखी टाकितो । सुगंध घेणे विसरून ।।३८४।। फूल तरी हवे कशास भक्तीला । पानही एक पुरे मला । तेही ताजे न लागे मला । शिळे सुकलेले चाले।।३८५।।भुकेजला अमृताने संतोषतो । तसा ते पान आनंदाने खातो । प्रेमे भरलेले आहे हे जाणतो। पान असले तरी ।।३८६।। परी असेही कोठे घडेल । पानेही न मिळतील। पाण्यास तरी तोटा नसेल । कोठेही ना! ।।३८७।। न कष्टता मिळालेले । पाणी असे कुठेही भले । तेच सर्वस्व समजून दिले । ज्यांनी मला ।।३८८।। त्यांनी वैकुंठाहून विशाल। अर्पण केले देऊळ । कौस्तुभाहून निर्मळ । अलंकार जणु दिले ।।३८९।। जसा का क्षीरसागर । तशी जणु दिली अपार । दुधाची शयनगृहे मनोहर । तयार करुनी ।।३९०।। कापूर, चंदन, अगरु असे सुगंधाचे महामेरु । दीपमाळेवर जणु गेला धरू । सूर्य माझ्यासाठी ।।३९१।। गरुडासारखी वाहने । कल्पतरूंची उद्याने । कामधेनूंची गोधने । त्यांनी जणु अर्पिली मला ।।३९२।। त्यांनी अमृताहून सरस । पक्वान्ने वाढली नैवेद्यास । भक्तांच्या पाण्यानेही संतोष । मला असा वाटे ।।३९३।। अर्जुना तुला काय सांगावे हे । डोळ्यांनी

तू पाहिले आहे। सुदाम्याचे खाण्या पोहे । पुरचुंडीच्या गाठी सोडिल्या ।।३९४।। आम्ही फक्त भक्ती जाणतो । लहानथोर न म्हणतो । भक्तिभावाचे पाहुणे होतो । कोणाच्याही ।।३९५।। इतर पान-फूल-फळ । भक्तीचे ते निमित्त केवळ । खरा मला आवडे निर्मळ । शुद्ध भक्तिभाव ।।३९६।। म्हणुनी अर्जुना ऐकणे । बुद्धी आपुली वश करणे। कधी माझे विस्मरण न होऊ देणे । मनोमंदिरी तुझ्या ।।३९७।।

कर्म वा अन्न वा हवन, तप वा दान देशिल ।
कौन्तेया ते करी अर्पण, मजला भावभक्तिने ।।भावगीता.२७।।

जे जे काही व्यवहार करिसी । अथवा भोग भोगिसी । किंवा यज्ञात यजसी । नाना विधीने ।।३९८।। सत्पात्री करिशी दाने । किंवा सेवकांना देशी वेतने । तपासारखी व्रते साधने । तू जी करितोस ।।३९९।। ज्या ज्या क्रिया तुझ्याकडून । स्वभावता घडती सहज जाण । त्या त्या माझ्यासाठी म्हणून । करीत जाव्या अवघ्या ।।४००।।

असा त्यांच्या फळांतून, कर्मबंध विमुक्त तू ।
खरा संन्यास अन् योग, साधुनी भेटशी मज ।।भावगीता.२८।।

क्रिया सर्वही आचरी । परि केल्याचे स्मरणही न धरी । कर्तृत्व धुऊन कर्मे माझ्या करी ।

देई तू सदा ।।४०१।। अग्निकुंडात बीजे घातली । ती जशी अंकुरदशेला मुकली । तशी शुभाशुभ कर्मे मला अर्पिलेली । फळ न देती ।।४०२।। अरे कर्म जरी उरते । तरी त्याला सुखदु:ख फळ येते । ते भोगण्यास यावे लागते । देहा एका ।।४०३।। म्हणून कर्म केल्या मज अर्पण । पुसून जाते जन्ममरण । कष्टही जाती दारुण । जन्मानंतरचे ।।४०४।। कर्मे अर्पिण्याची युक्ती सोपीच । अंमलात आणी आजच । वेळ न दवडी उगीच । पाहाण्यात आता अर्जुना ।।४०५।। देहाच्या कैदेत न पडावे । सुखदु:खसागरी न लागे बुडावे । या युक्तीने सुखरूप यावे । माझ्या स्वरूपास ।।४०६।।

सर्वांशी सम मी राही, प्रिय-अप्रिय नसे मला ।
परंतु भक्त जे माझे, मीही त्यांचा असे तसा ।।भावगीता.२९।।

विचारिसी मी कसा असे । ऐक, सर्व भूतांना व्यापून असे । आपपर माझ्याजवळ नसे । भेद काही ।।४०७।। असे माझे स्वरूप जाणुनी । अहंकार समूळ सोडुनी । मनापासून कर्मे करुनी । माझी भक्ती करिती ।।४०८।। ते वावरती जरी देहात । तरी ते न राहती त्यात। ते असती सदा माझ्यात । मीही भरलो त्यांच्या हृदयी ।।४०९।। इवलेसे जरी बीज ।

वटवृक्षविस्तार मावे त्यात सहज । पाही जरी तो वृक्षराज । त्यात ते दिसे बीज ।।४१०।। तसा आमचा संबंध परस्पर । नावाचाच भेद बाहेर । आतला पाहिला विचार । तरी मी ते एकचि ।।४११।। उसने दागिने अंगावरी । जसा एखादा धारण करी । तसा भक्त देह धरी। उदासीनतेने ।।४१२।। वाऱ्याने अवघा सुगंध नेल्यावर । ओस फूल जसे राही देठावर। तसा राहे प्रारब्धावर । देह ज्यांचा ।।४१३।। एरवी ते देहादि अहंकार विसरले। माझ्या भावावरी आरूढ झाले । माझ्या स्वरूपी स्थिर झाले । आधीच जे ।।४१४।।

अतिदुराचारी जरी भजला, अनन्यभक्तिने मला ।
सद्‌बुद्धी होउनी टिकता, मानावा साधु तो भला ।।भावगीता.३०।।

असे प्रेमभावाने मला भजता । नसे पुनर्जन्मांची शक्यता । भक्त जातीचा असता । कोणत्याही ।।४१५।। आणि आचरण जरी पाहशील । दुष्कृत्येच भरपूर दिसतील । तरी उरले आयुष्य जरी वेचेल । भक्तीसाठी ।।४१६।। अंती असते जशी मती । तशी मिळते पुढील गती । मनापासून जरी भक्ती । अंतकाळी करिती ।।४१७।। आधी असे जरी अनाचारी । तरी समजा त्यासी उत्तम सर्वतोपरी । जसा बुडाला महापुरी । तरी न बुडता

निघाला ।।४१८।। बुडता परी काठावर निघाला । जिवंतपणी बाहेर आला । तसे पाप न लागे त्याला । भक्ती करिता शेवटी ।।४१९।। म्हणुनी दुष्कर्मी जरी असला । तरी पश्चात्तापतीर्थी न्हाला । न्हाऊन मजजवळ आला । अनन्यभावाने ।।४२०।। मग आता त्याचे पवित्र कुळ । होतसे शुद्ध आणि निर्मळ । जन्मा आल्याचे फळ । त्यानेच जोडले ।।४२१।। त्याचे सकळ अध्ययन झाले । खरे तप त्यानेच केले । अष्टांगयोग अभ्यासिले । त्यानेच खरे ।।४२२।। हे वर्णन असो पार्था । कर्मबंध तरला सर्वथा । ज्याची टिके अखंड आस्था । माझ्या ठायी।।४२३।। मनोबुद्धीचे अवघे वागणे । एकनिष्ठेच्या पेटीत भरणे । भरून माझ्यामध्ये ठेवणे । असे करी जो अर्जुना ।।४२४।।

पावित्र्य येतसे शीघ्र, शांती, मोक्षहि येत ते ।
माझा भक्त असे त्याचा, नाश कधिही न होतसे ।।भावगीता.३१।।

तो पुढे माझ्यासारखा होईल । ही कल्पना तुलाही येईल । अरे अमृतात जो राहील । त्याला मरण कुठले ।।४२५।।ज्या वेळी सूर्य नसे उगवलेला । रात्र म्हणती त्या वेळेला । ज्यांत मी नसे स्मरलेला । ते ते कर्म महापाप ।।४२६।। म्हणुनी मी ज्यांच्या चित्ती वसे । माझी ज्याला जवळीक असे । तो तत्त्वता स्वरूप असे । माझे झाला ।।४२७।। जसा दिव्याने दिवा

लाविला । आधीचा नंतरचा नोळखे कुठला । तसा सर्वस्वे जो मला भजला । तो मीच होय ।।४२८।। मग माझी नित्य शांती । तीचि त्याची अंगकांती । किंबहुना माझी दशा-स्थिती । तोही जगे ।।४२९।। इथे पुन्हा पुन्हा । तेचि किती सांगू अर्जुना । जरी आवड माझी मना । तरी भक्ती सोडू नको ।।४३०।। अरे येथे कुळाचे मोठेपण । न येते उपयोगा जाण । शास्त्राध्ययनांचे केले व्यसन । उपयोगा न येते ।।४३१।। सौंदर्याने मत्त व्हावे । संपन्नतेने आणि डोलावे । त्यात भक्तिभाव जरी न व्हावे । तरी ते निष्फळ ।।४३२।। धान्य नसता कणसे आली । जरी असती दाट भरली । वस्ती नसता थाटली । नगरे जैशी ।।४३३।। जसे सरोवर आटले । रानी दु:ख्याला दु:खी भेटले । वांझ फुलांचे बहर आले। झाडास जसे ।।४३४।। तसे ते सकळ वैभव । अथवा कुळजाति गौरव । जसे शरीरास आहेत अवयव । परी जीवचि नाही ।।४३५।। माझ्या भक्तीवीण । जळो ते मनुष्यजीवन। अरे पृथ्वीवरी पाषाण । नसती का ? ।।४३६।। जशी हिवराची दाट सावली । सज्जन टाळिती भली । तशी पुण्ये टाळून गेली । अभक्तांना ।।४३७।। निंबोळीला बहर येतो । तरी कावळ्यांचा सुकाळ होतो । तसा भक्तिहीन जरी वाढतो । तरी पापचि वाढे ।।४३८।। पक्वान्ने खापरात वाढली । ती चव्हाट्यावरी रात्री ठेविली । त्याने श्वानांची सोय झाली ।

असेचि होते ।।४३९।। तसे भक्तिहीनाचे जिणे । स्वप्नातही पुण्यकर्म नेणे। संसारदु:खाला आमंत्रणे । त्याने करूनी ठेविली ।।४४०।।

प्रतिज्ञेने खरे बघ हे, म्हणुनी पापी असोत वा ।
स्त्रिया वैश्य तसे शूद्र, भक्तीने गति साधिती ।।भावगीता.३२।।

म्हणुनी उत्तम कुळ नसेल । जातीही खालची असेल । देह पशूचा देखील । असला तरी चाले ।।४४१।। मगरीने हत्तीला धरिले । त्याने काकुळतीने मला स्मरले । पशुत्व कोठे आड आले । माझी प्राप्ती घडण्या ? ।।४४२।। शेवटच्या जातीचे होती । ज्यांची नावेही न उच्चारिती । अशा पापयोनीत जन्मती । पाहा जे अर्जुना ।।४४३।। अशा पापयोनीत मूढ । मूर्ख जरी असती दगड । परी माझ्या ठायी दृढ । सर्वभावाने ।।४४४।। ज्यांच्या वाचेत माझे आलाप । दृष्टी पाहे माझेचि रूप । ज्यांचे मन संकल्प । माझाचि वाहे ।।४४५।। माझ्या कीर्तीवाचून । जे न काही करिती श्रवण । ज्यांच्या सर्वांगाला असे भूषण । माझी सेवा ।।४४६।। विषय नसे ज्यांच्या ज्ञानाला । माझ्याहून दुसरा जाणायाला । सार्थक मानिती अशा जिण्याला । एरवी मरण ।।४४७।। तरी पाही अर्जुना । सर्वभावाने आपुल्या

जीवना । जगविती सर्व वृत्तींना । माझेमय करूनी ।।४४८।। ते पापयोनीचे का असोत। विद्वत्ता कुठली न जाणोत । परी ते कमी नाहीत । माझ्याशी तुलना करिता ।।४४९।। दैत्य जरी भक्तिमंत । ते देवाहून कमी न होत । मला नृसिंहत्व धरावे लागत । त्यांच्या भक्तीसाठी ।।४५०।। माझ्याऐवजी प्रल्हादाची भक्ती । कितीक करिती किरीटी । मी द्याव्या त्या गोष्टी। त्याच्या भक्तीनेही मिळती ।।४५१।। एरवी तो दैत्यकुळीचा असून । इंद्रही त्यापुढे श्रेष्ठ न जाण । भक्तीपुढे ठरते म्हणून । जाती अप्रमाण ।।४५२।। राजाज्ञेची अक्षरे उमटती। एक चर्मपत्रावरती । तरी त्या चामड्याने किती । घेता येती वस्तु ।।४५३।। येथे सोनेरूपे प्रमाण नसे । एक राजाज्ञा समर्थ असे । चर्मपत्रावरी जरी असे । तरी मिळते सर्व त्याने ।।४५४।। तसे उत्तमत्व तेव्हा तरेल । सर्वज्ञताही जोडली जाईल । जेव्हा मनोबुद्धी भरेल। माझ्या प्रेमाने ।।४५५।। म्हणुनी कुळजातीवर्ण । हे अवघेचि अर्जुना अकारण । येथे माझ्याशी अनन्यपण। ते एक सार्थक करी ।।४५६।। असो भावाने कुठल्याही । मन जरी माझ्याकडे येई । तरी त्याचे कुळादि सर्वही । होतसे निष्फळ ।।४५७।। जोवरी गंगेत न मिसळत । तोवरी ते वहाळ ओढे होत । मिळल्या मग गंगारूप

पावत । तेही सकळ ।।४५८।। खैर, चंदन ही लाकडे । या भेदांची विवंचना पडे । जोवरी आगीत न पडे । लाकूड तोवरी ।।४५९।। क्षत्रिय, वैश्य, स्त्रिया अशा। किंवा शूद्र अंत्यजादि अशा । जाती वाटती वेगळ्याशा । जोवरी माझ्यात न येती ।।४६०।। सागरी मिठाचे कण घातले । ते जसे वेगळे न उरले । तसे भावाने एकरूप झाले । मग जाती, ना व्यक्ती ।।४६१।। महानद्या-नद्यांची नावे । पूर्वपश्चिम वाहती म्हणावे । भेद न उरती कुठले पहावे । समुद्री मिळता ।।४६२।। खरे कुठल्या तरी निमित्ताने । माझ्या चित्ती प्रवेशणे । मग घडे माझ्याशी सहजपणे । एकरूप होणे ।।४६३।। परिस फोडण्यासाठी जरी । लोखंड पडो परिसावरी । स्पर्श घणाचा होता परी । तो सोने होईल ।।४६४।। पहा प्रेमाच्या निमित्ताने । गोपींची नाही का अंत:करणे । झाली सदा माझ्या चिंतने । माझे स्वरूप ती ।।४६५।। भीतीनेच माझ्या केवळ । आला नसे का कंस जवळ । अखंड शत्रुत्वेही आले जवळ । शिशुपालादिक ।।४६६।। अरे नात्यानेचि पांडवा । सान्निध्य लाभले यादवा । वसुदेवादिक सर्वा । मी ममत्वे मिळालो ।।४६७।। नारदा, ध्रुवा, अक्रूरा । शुका आणि सनत्कुमारा । भक्तीने मी धनुर्धरा । प्राप्त झालो ।।४६८।। गोपींना विषयबुद्धीने । कंसाला मिळालो भयसंभ्रमाने। इतरांना घातक वैराने । शिशुपालादिकांना ।।४६९।।

अर्जुना मी मुक्कामाचे ठाणे। गाठावे कुठल्याही मार्गाने । विषय, प्रेम, भक्तीने । किंवा वैरबुद्धीने ।।४७०।। म्हणून पार्था पाही । यावया माझ्या ठायी । साधनमार्गांचे कुठलेही । बंधन नसे ।।४७१।। कुठल्याही जातीत जन्मावे । परि माझे भक्त व्हावे । किंवा माझे वैर धरावे । तरी चालेल ।।४७२।। निमित्त कोणतेही असले । आणि माझ्याशी जोडले गेले । तरी माझे स्वरूप आले । हाताशीच ।।४७३।। म्हणून व्यक्ती पापी जरी असेल । किंवा स्त्री, वैश्य, शूद्र असेल । तरी माझी भक्ती करिता पोचेल। माझ्याच घरी ।।४७४।।

मुक्त ते सहज होतील, राजर्षी भक्त ब्राह्मण ।
म्हणुनी अनित्य, दुःखाच्या, या लोकी मजला भज ।।भावगीता.३३।।

मग वर्णांमध्ये छत्रचामर । स्वर्ग ज्यांच्या कंठी हार । मंत्रविद्येचे माहेर । ब्राह्मण जे ।।४७५।। जेथे यज्ञ वास करिती । जे वेद नित्य सांभाळिती । ज्यांच्या दृष्टिरूप मांडीवरती । मांगल्य वाढे ।।४७६।। जे पृथ्वीवरील देव । जे तपोवतार सावयव । ज्यांच्या रूपाने सुदैव । उदय पावे तीर्थांचे ।।४७७।। ज्यांच्या आस्थेचा ओलावा असतो। म्हणुनी सत्कर्मांचा वेल वाढतो। ज्यांच्या संकल्पाने जगतो । सत्यधर्म ।।४७८।। आशीर्वाद मिळता ज्यांचे । आयुष्य वाढे अग्नीचे । समुद्र देई पाणी स्वतःचे । म्हणून ज्यांना प्रेमाने ।।४७९।।

मी लक्ष्मी बाजूस सारुनी । कौस्तुभ हाती घेउनी । छाती ज्यांच्यापुढे आदरे ठेवुनी । वाट पाही चरणधुळीची ।।४८०।। त्यांच्या पावलांची खूण । मी हृदयी वागवितो जाण । माझा भाग्यसमुद्र जतन । करण्यासाठी ।।४८१।। ज्यांचा राग असे जाण । काळाग्निरुद्राचे वसतिस्थान । प्रसन्न होता देती जे दान । महासिद्धींचे ।।४८२।। असे पुण्यपूज्य ब्राह्मण जे होत। ते माझ्याठायी तत्पर असत । ते मला येऊन मिळत । हे काय सांगावे ।।४८३।। चंदनाच्या अंगस्पर्शाने बाजूची । झाडे जरी असती लिंबाची । शोभविती मस्तके देवांची । निर्जीव पाने असुनी ।।४८४।। मग चंदन तेथे न जाय। ऐसे कैसे होय । पोचला तरीच मानावे काय । खरे तेव्हा हे ? ।।४८५।। शांत करील अशा आशेने । पहा मस्तकी शिवाने। अर्धाच चंद्र अखंडपणे । धरिला असे ।।४८६।। चंदन आगळे चंद्राहून । सुवासिक आणि संपूर्ण । सर्वांगी दिसेल शोभून । मस्तकी का नुसते ? ।।४८७।। गंगेस मिळता येउनी। समुद्रास जाते कुठलेही पाणी । गंगेस समुद्राशिवाय कुठुनी । गती दुसरी आहे ? ।।४८८।। म्हणुनी राजर्षी वा ब्राह्मण । बुद्धीने, क्रियेने मला शरण । त्यांना त्रिशुद्धी, जगणे, निर्वाण । मीच आहे ।।४८९।। जर्जर झालेल्या नावेत बसुनी । निश्चिंत रहावे कसे जीवनी।

शस्त्रवर्षाव होता वरुनी । उघडे कसे रहावे ?।।४९०।। म्हणुनी दगड पडता अंगावरी। का ढाल न घ्यावी करी । रोगग्रस्त असता शरीरी । औषधास उदास का व्हावे ? ।।४९१।। जिथे सर्वत्र लागे वणवा । न जावे का तेथुनी पांडवा । सतत सोसता उपद्रवा । भक्ती का न करावी ? ।।४९२।। अरे भक्ती न करण्याजोगे । बळ कोणते असे यांचे अंगे । घरेदारे, विविध भोगे । का निश्चिंत झाले ।।४९३।। का विद्या वा तारुण्य आले । म्हणून हे बेपर्वा झाले। सुखाच्या भरवशावरी राहिले । का हे भक्तीविना ।।४९४।। जे वाटे सुख मिळतसे। ते ते देहासाठीच असे । तो देह मृत्यूच्या तोंडी वसे । प्रतिक्षणी पहा ।।४९५।। दु:खरूपी माल आला । मरणाच्या मापाने जातसे मोजला । मृत्युलोकीच्या शेवटच्या बाजाराला । नरदेहाच्या ।।४९६।। आता सुखाने जगण्याचा माल । या बाजारी कसा मिळेल । राख फुंकून का लागेल । दिवा कधी ।।४९७।। अरे विषाचे कांदे वाटुनी । येईल तो रस घेउनी।त्याला नाव अमृत ठेवुनी । जसे अमर व्हावे ।।४९८।। तसे विषयांचे जे सुख । ते केवळ परमदु:ख। पण काय करिती मूर्ख । सेविल्यावीण राहवेना ।।४९९।। आपलेच मस्तक कापावे । आणि पायाच्या जखमेला बांधावे । तसे जगातले होती पहावे । व्यवहार

सगळे ।।५००।। म्हणून मृत्युलोकी सुखाची कहाणी । ऐकण्यास मिळेल का कानी । कशी मिळेल सुखनिद्रा अंथरुणी। निखाऱ्यांच्या ।।५०१।। या जगीचा चंद्र क्षयग्रस्त । उदय पावतो होण्या अस्त । सुखाचे घेउनी वेष समस्त । दुःख छळते जगाला ।।५०२।। जेथे मांगल्य अंकुरताच । अमंगळाची लागे त्या कीडच । गर्भाला मृत्यु गाठी उदरीच । या जगात।।५०३।। जे सुख मिळणार नाही येथे । त्याचे चिंतन करावयास लागते । मिळते थोडे तरी ते कोण नेते । कुठे तेही कळेना ।।५०४।। शोधले जरी किती वाटांनी । न मिळे परतले पाऊल मृत्यूहुनी । येथील पुराणेही भरली गोष्टींनी । मृत्यु पावलेल्यांच्या ।।५०५।। इथली थोर क्षणभंगुरता । ब्रह्मदेवाही देई अनित्यता । नष्ट होण्याची व्यापकता । ऐक केवढी ही ।।५०६।। अशी ज्या मृत्युलोकीची नांदणूक । तिथे जन्मले जे लोक । त्यांच्या निश्चिंत राहण्याचे कौतुक । केवढे दिसतसे ।।५०७।। ज्यात इहपर आनंदाची प्राप्ती। त्यासाठी कवडीही न खर्चिती । प्रपंचात कोटी उधळिती । जिथे हानी सर्वस्वाची।।५०८।। जो विषयविलासात गुंतला । त्यास म्हणती सुखी झाला । लोभभाराने दडपला। त्याला सज्ञान म्हणती ।।५०९।। ज्याचे आयुष्य कमी होय । शक्तीबुद्धी जिरून जाय । त्याचे नमस्कारिती पाय। वडील म्हणुनी ।।५१०।। बाळ वाढता वयाने । मोठे नाचती आनंदाने । आतून कमी

होते वयाने । त्याचे नसे भान।।५११।। जो जन्मदिवसापासून पुढे चालला । काळाच्या तोंडी गेला । गुढ्या उभारिती त्याच्या वाढदिवसाला । उल्हासाने ।।५१२।। मरण शब्दालाही घाबरती । मेला तरी रडती । परि आयुष्य जातेच याची गणती । कोणी न करी।।५१३।। इकडे साप गिळी बेडकाला। तरी बेडूक माशासाठी भुकेला । तसे प्राणी वाढविती तृष्णेला। कोणत्या लोभाने।।५१४।। मृत्युलोकीचा उफराटा न्याय । किती विचित्र हा होय । जन्मलासी कसा काय । अर्जुना येथे अवचित ।।५१५।। तरी आता नीघ झडकरी । वाट भक्तीची धरी । तिने निश्चित येशील घरी । माझ्या स्वरूपाच्या ।।५१६।।

मन माझ्यात, मद्भक्त, ममोपासक, नमी मज ।
मत्परायण निष्ठेने, तादात्म्ये मीच होशिल ।।भावगीता.३४।।

तू मन हे मीच करी । माझ्या भजनी प्रेम धरी । सर्वत्र नमस्कारी । मज एकाला ।।५१७।। माझ्या अनुसंधानाने । इच्छा संकल्प नि:शेष जाळणे । त्याचेच नाव भक्ती करणे । खरी माझी ।।५१८।। असा माझा होऊन राहशी । तरी माझ्या स्वरूपा पावशी । हे अंत:करणातले तुझ्यापाशी । बोलत आहे ।।५१९।। अरे सर्वांपासून जे आपले। सर्वस्व आम्ही चोरून ठेविले। ते तुला प्राप्त झाले । आता सुखरूप राहाशी ।।५२०।। असे त्या सावळ्या

परब्रह्माने । भक्तकामकल्पद्रुमाने । बोलिले आत्मारामाने । संजय म्हणे ।।५२१।। धृतराष्ट्रा म्हणे संजय। ऐकत आहा हे काय । परि पुरातल्या रेड्यापरी निवांत होय । तो वृद्ध तेव्हा ।।५२२।। तेव्हा संजयाने माथा नमविला । अहा अमृताचा पाऊस वर्षला । पण हा इथेच असून गेला । दुसऱ्या गावा ।।५२३।। असे बोलता मालकाला । दोष लागेल वाचेला । काय करणार स्वभावाला । हा असाच आहे ।।५२४।। असो केवढे भाग्य माझे । निमित्त करुनी यांना सांगायाचे । भवसागरी रक्षण केले माझे । श्री व्यासदेवांनी ।।५२५।। आनंद आवरून कष्टाने । परमात्मवचने बोलत होता दृढ मनाने । आता संजयाला सात्त्विक भावाने । स्तब्ध केले ।।५२६।। चित्त चकित होउनी आटले । शब्द तेथेच पांगुळले । रोमांच उभे राहिले । आपादमस्तक ।।५२७।। अर्धोन्मीलित डोळे । वर्षत होते आनंदजळे। आत उपदेशाने सुखावलेले । शरीर बाहेर कापू लागले ।।५२८।। सर्व रोमांच्या मुळात आले। निर्मळ घामाचे बिंदु प्रकटले । मोत्यांचे आवडते वस्त्र घातले । तसा दिसे ।।५२९।। येता महासुखे असली । जीवदशा नष्ट होण्या आली । व्यासांच्या आज्ञेने थांबली । तेथेच ती ।।५३०।। कृष्णार्जुनांचे बोलणे । तेवढ्यात ऐकिले कानाने । देहाची स्मृती त्याने ।

परत आली ।।५३१।। तेव्हा आनंदाश्रु टिपुनी । सर्वांगीचा घाम पुसुनी । म्हणे आता धृतराष्ट्र महाराजांनी । लक्ष द्यावे ।।५३२।। बीजे उत्तम कृष्णवचनांची । सात्विक भावांची जमीन संजयाची । विपुल पिके सिद्धांतांची । श्रोत्यांना मिळतील ।।५३३।। थोडे जरी लक्ष द्यावे । तरी आनंदराशीवर बसावे । अहो माळ घातली सुदैवे । कानांना जणु ।।५३४।। म्हणून आपुल्या विभूतींचा ठाव । अर्जुना सांगेल सिद्धांचा राव । ते ऐका म्हणे ज्ञानदेव । निवृत्तीचा ।।५३५।।

**गीतोपनिषदातील, राजविद्यारहस्य हा ।**
**अध्याय संपला नववा, भावे कृष्णास अर्पिला ।। ॐ तत्सत् ।।**
**अध्यायाची भावार्थ समओवी संपली । दीना प्रेरणा श्री ज्ञानेश्वर माउली ।**
**तिच्या चरणकमली अर्पिली। कृतज्ञ भावाने ।। श्रीराम।।**
**ॐ श्री सच्चिदानंदार्पणमस्तु ।**

***

## नवव्या अध्यायाची आरती

जय जय ज्ञानेश्वरी नवव्या अध्याया । देशी मार्ग सर्वा देव मिळवाया ।। जय देव जय देव ।।धृ।।

अठरा अध्यायांत गीतार्थ आला। नवव्यामध्ये देव सर्वांचा झाला ।
सामान्यांचे प्रेमहि आहे देवाला । पापी अज्ञ जीवा आश्वासन झाला ।। जय देव जय देव ।।१।।

ज्ञान भक्ती योग संन्यास आले । आदर राखुनि वेदा स्थान दाविले ।
सोपे नाम, कीर्तन महिमे गाईले । कर्ममार्गे कैसे चालावे भले ।। जय देव जय देव ।।२।।

देवाला आवडे फळफूलपान । पाणी चाले, श्रेष्ठ भाव त्याहून ।
वडीलकीला लागे भक्तीचे ज्ञान। माऊलींचे जीवन त्याला प्रमाण ।। जय देव जय देव ।।३।।

देव अकर्ता हा काय विचार। विपरित ज्ञान, भक्ती त्याज्य प्रकार।
कोण्या रीती खरा देव मिळणार । रहस्य कळुनी दीना आनंद फार ।। जय देव जय देव ।।४।।

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. अध्याय नववा : समओवी

२. हरिपाठपराग

३. दर्शन

४. कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट

५. साधनपदावली

६. जपसंकल्प

७. अभंगसाधना

८. जाग

९. जीवनजिज्ञासा

१०. विचारविश्वाची ओळख

११. चैतन्यचिंतन

१२. किमया

१३. प्रसादकण

१४. ठेवा

१५. संतबोध : भाग १

१६. संतबोध : भाग २

१७. संतबोध : भाग ३

१८. वृत्त्यंतरप्रकाश
१९. नाम
२०. श्री विष्णुसहस्रनाम
२१. चिंतनक्षण (एकत्रित आवृत्ती)
२२. उपासनेची नोंदवही
२३. उत्तरायण - भाग १
२४. शोध
२५. दिशा
२६. उत्तरायण - भाग २
२७. मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी
२८. बासरी
२९. उपासना
३०. अध्याय बारावा : समओवी
३१. कृपापदावली भाग : १
३२. कृपापदावली भाग : २
३३. साधनपदावली भाग १

३४. सारविस्तार भाग : १

| | |
|---|---|
| ३५. साधनप्रेरणा | ३६. मेरी यात्रा (हिंदी) |
| ३७. बोधपाठ | ३८. एकाध्यायी विचारगीता |
| ३९. सृष्टिसंदेश | ४०. गुरुतत्त्वतरंगिणी |
| ४१.समओवी पारायणप्रत | ४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) |

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके)

| | |
|---|---|
| ५५. शिदोरी | ५६. विचारविसावा |
| ५७. सारविस्तार भाग २ | ५८. महाराजांची शाळा |
| ५९. साधनपदावली भाग २ | ६०. आरतीपुष्पमाला |
| ६१. विनवणीची वाणी | ६२. श्रद्धेची पहाट |

६३. उपासनामाला

६४. पावनपथ

६५. अनुभवपुष्पे - भाग १

६६. कृतज्ञतामार्ग

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)

६९. संतबोध : भाग ४

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार

७१. उत्तरायण -भाग ३

७२. अनुभवपुष्पे - भाग २

७३. श्रद्धा

७४. अनुभवपुष्पे - भाग ३

७५. अर्घ्य

७६. जीवनचिंतन

७७. स्वास्थ्यसंवाद

७८. वचनांजली भाग १

७९. अक्षरायण

८०. वचनांजली भाग २

८१. भावगीता

***



अध्यायाची भावार्थ समओवी संपली । दीना प्रेरणा श्री ज्ञानेश्वर माउली ।
तिच्या चरणकमली अर्पिली । कृतज्ञ भावाने ।। श्रीराम ।।
ॐ श्री सच्चिदानंदार्पणमस्तु ।

संतछाया, सातारा